# कार्ड मेंबर करार

कृपया अद्यावत कार्ड मेंबर करारासाठी www.rblbank.com पहा.

# कार्ड मेंबर करार

हा करार आरबीएल बँक लिमिटेड आणि कार्ड मेंबरच्या दरम्यान आहे.

**1. व्याख्या**

1.1 अर्जदार ती व्यक्ति असेल जी आरबीएल बँक क्रेडिट कार्ड मिळवू इच्छिते.

1.2 "आरबीएल बँक क्रेडिट कार्ड" किंवा "क्रेडिट कार्ड" किंवा "कार्ड" किंवा "कार्ड नंबर" म्हणजे एक वैध क्रेडिट कार्ड असेल ज्यामध्ये आरबीएल बँक लिमिटेड द्वारे जारी केलेले को-ब्रँडेड क्रेडिट कार्डचा समावेश आहे (जे कार्ड मेंबरला पूर्व-निर्धारित क्रेडिट मर्यादा असलेले कार्ड खाते वापरण्याचा अधिकार देते.

1.3 "अतिरिक्त क्रेडिट कार्ड" किंवा "अॅड-ऑन क्रेडिट कार्ड" म्हणजे प्राथमिक कार्ड मेंबरच्या विनंतीवर अतिरिक्त कार्ड मेंबरला जारी करण्यात आलेले क्रेडिट कार्ड असेल.

1.4 "अतिरिक्त कार्ड मेंबर" म्हणजे अशी व्यक्ति असेल जी भारतीय निवासी आहे आणि प्राथमिक कार्ड मेंबरच्या स्वतःच्या कुटुंबातील सदस्य आहे म्हणजेच पत्नी/पती, भाऊ, बहीण, आई-वडील आणि मुलं आणि ज्यांचे वय 18 वर्षांपेक्षा अधिक आहे ज्यांना प्राथमिक कार्ड मेंबरच्या विनंतीवरून अतिरिक्त क्रेडिट कार्ड जारी केले जाईल आणि ज्यांचे शुल्क प्राथमिक कार्ड मेंबरच्या कार्ड खात्यात आकारले जातील.

1.5 "बँक, आपण, आम्ही, आमचे" किंवा असेच उच्चारण म्हणजे आरबीएल बँक, तिचे उत्तराधिकारी, नियुक्त कर्मचारी, प्रशासक, लिक्विडेटर्स, नामनिर्देशित व्यक्ती इत्यादी, जसा प्रसंग असेल तसे, असू शकते.

1.6 "बिल चक्र" म्हणजेच दोन लगोपाट बिलिंग स्टेटमेंट्सच्या निर्मिती दरम्यानचा कालावधी असेल.

1.7 "कार्ड मेंबर", "प्राथमिक कार्ड मेंबर", "मेंबर", "ग्राहक", तुम्ही, तुमचे, त्यांचे, तो, त्याचे किंवा यासारखे उच्चारण म्हणजे ती व्यक्ति असेल ज्यांच्या नावे कार्ड जारी करण्यात आले आहे आणि कार्ड खाते नमूद आहे.

1.8 "कार्ड खाते" किंवा "खाते" म्हणजे प्राथमिक कार्ड मेंबरच्या नावाने, या अटी आणि नियमांच्या अंतर्गत बँकेद्वारे सांभाळले जाणारे खाते असेल.

1.9 "कार्ड नंबर" म्हणजे तुमच्या कार्डच्या दर्शनी भागावर उमटवण्यात आलेले अद्वितीय 16 अंक (यामध्ये अतिरिक्त क्रेडिट कार्डच्या कार्ड नंबरचा सुद्धा समावेश आहे, जर कोणतेही असेल).

1.10 "को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड" म्हणजे इतर कोणत्याही संस्थेच्या सहयोगाने बँकेद्वारे जारी करण्यात आलेले क्रेडिट कार्ड ज्यामध्ये इतर कोणत्याही क्षेत्रासोबतच व्यावसायिक/व्यवसाय कार्यात व्यस्त संस्थेचा समावेश आहे मात्र हे इतकेच मर्यादित नाही.

1.11 "क्रेडिट मर्यादा" म्हणजे कोणत्याही क्षणी बँकेच्या सर्व कार्ड खात्यातून मिळवले जाऊ शकणारे कमाल क्रेडिट.

1.12 "शुल्क" चा अर्थ या कराराअंतर्गत कार्ड खात्यात केलेले किंवा आकारलेले व्यवहार, मग भलेही कार्ड मेंबर शुल्क पावती/पत्राच्या नोंदीवर सही करतात किंवा नाही. यामध्ये कार्ड किंवा कार्ड नंबरच्या वापराद्वारे खात्यातून केलेली वस्तू/सेवांची खरेदी, रोख रक्कम काढणे, ड्राफ्ट्स, वार्षिक शुल्क, फायनांस शुल्क, ओवर लिमिट शुल्क, विलंब भरणा शुल्क, व्यवहार शुल्क, सेवा शुल्क, वस्तू आणि सेवा कर आणि इतर कोणतेही फी/शुल्क/रक्कम इत्यादीचा समावेश आहे, परंतु हे इतकेच मर्यादित नाही, जे या कराराच्या अंतर्गत कार्ड मेंबर भरण्यासाठी सहमत झाले आहेत किंवा बँकेला भरणा करण्यासाठी जबाबदार आहेत.

1.13 "रोख रक्कम काढण्याची मर्यादा" म्हणजे बँकेतील सर्व कार्ड खात्यांमध्ये खरेदी-विरहित व्यवहारासाठी कार्ड मेंबरला वापरण्याची परवानगी दिलेली रोख किंवा समतुल्य रोख रक्कम.

1.14 "CVC2" (सीवीसी2) म्हणजे कार्ड मेंबरच्या क्रेडिट कार्डाच्या मागील बाजूला स्वाक्षरी पॅनलवर (चुंबकीय पट्टी खाली) असलेल्या संख्येचे शेवटचे तीन अंक. सीवीसी2 एक सुरक्षा वैशिष्ट आहे, जे इंटरनेटवरील व्यवहारांसाठी ओळखीच्या उद्देश्यासाठी किंवा फोनवर कार्ड मेंबरच्या ओळखीसाठी वापरण्यासाठी आहे.

1.15 "इलेक्ट्रॉनिक टर्मिनल" म्हणजे कोणतेही ब्रांच टेलर टर्मिनल, ऑटोमेटेड टेलर मशिन्स (एटीएम), पॉइंट ऑफ सेल्स टर्मिनल, ईडीसी (इलेक्ट्रॉनिक डेटा कॅप्चर मशिन) किंवा इतर कोणतेही उपकरण ज्यामध्ये क्रेडिट कार्ड आणि/किंवा पिन (वैयक्तिक ओळख क्रमांक) वापरले जाऊ शकते, आणि जे या अटी आणि नियमांमध्ये सांगितल्यानुसार बँकेद्वारे अधिकृत केलेले आहे.

1.16 "इलेक्ट्रॉनिक क्लीयरिंग सर्विस (डेबिट क्लीयरिंग किंवा ईसीएस)" म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे अधिसूचित केलेली डेबिट क्लीयरिंग सर्विस, ज्यामध्ये कार्ड खात्यातील शिल्लक रक्कमेचा भरणा सुलभ करण्यासाठी कार्ड मेंबर द्वारे लिखित स्वरुपात सहभागाची संमति दिलेली आहे.

1.17 "फायनांस चार्जेस" चा अर्थ होतो आणि यात समाविष्ट आहे अटी आणि नियमांमध्ये दिल्यानुसार कार्ड खात्यावरील एकूण थकबाकी रकमेवर आकारले जाणारे व्याज.

1.18 "व्यापारी आस्थापना" चा अर्थ होतो कोणतीही कंपनी, मंडळ, आस्थापना, संस्था, संघटना, व्यक्ति किंवा अशी कोणतीही संस्था जी नेटवर्क भागीदार (मास्टरकार्ड/विसा/रुपे) म्हणून निर्धारित केलेली आहे आणि/किंवा जिच्यासोबत कार्ड मेंबरने कार्ड किंवा कार्डनंबर वापरून वस्तू, सेवा किंवा रोख रक्कम मिळवण्यासाठी व्यवस्था केली आहे. आस्थापनेमध्ये इतरांसोबतच स्टोर्स, दुकाने, रेस्टोरंट्स, हॉटेल्स, विमानसेवा, एटीएम सह कॅश अॅडवांस पॉइंट्स आणि मेल ऑर्डर जाहिरातदार (मग ते दुकानदार, वितरक किंवा निर्माते असो) यांचा समावेश असेल. "व्यापारी" चा अर्थ होतो कुणीही व्यक्ति जी व्यापारी आस्थापना, तिचे उत्तराधिकारी आणि अनुज्ञप्त चिन्हांचे मालक आहे किंवा त्यांचे व्यवस्थापन किंवा संचालन करते.

1.19 “किमान देय रक्कम” म्हणजे कार्ड खात्यातील एकूण देय रक्कमेची अशी टक्केवारी, जी वेळोवेळी बँकेद्वारे निश्चित केली जाऊ शकते, जी कार्ड मेंबरने बिल चक्राच्या प्रत्येक प्रसंगी भरणे आवश्यक आहे आणि उर्वरित रक्कम भरणा करण्यासाठी पुढील बिल चक्रात पाठवली जाते. या उद्देश्यासाठी, हे स्पष्ट केले गेले आहे की कार्ड मेंबरने प्रत्येक बिल चक्रासाठी किमान देय रक्कम म्हणून दर्शवलेली किमान रक्कम भरणे अनिवार्य आहे आणि पुढील चक्रात पाठवलेल्या शिल्लक रक्कमेवर फायनांस शुल्क लागू होईल जो कार्ड मेंबरला भरावा लागेल.उशीरा देय भरणाचे शुल्क/ लेट पेमेंट फी (“एलपीएफ”) तेव्हा लागू होते जर कार्ड मेंबर द्वारे अंतिम तारखेला देय भरणा केला जात नाही किंवा किमान देय रक्कम (“एमएडी”) पेक्षा कमी देय भरणा केला जातो.

1.20 “खरेदी” म्हणजे कार्ड वापरून कार्ड मेंबर द्वारे केलेली वस्तू आणि सेवांची खरेदी.

1.21 “खरेदीची तारीख” म्हणजे ती तारीख असेल ज्या दिवशी कार्ड खात्यात व्यवहाराची नोंद झालेली आहे, ती तारीख नाही ज्या दिवशी ग्राहकाने प्रत्यक्ष खरेदी केलेली. सर्व शुल्क आणि बक्षिसं नोंद झाल्याच्या दिवसानुसार मोजले जातील.

1.22 “भरणा देय दिनांक” म्हणजे ती तारीख असेल जेव्हा किंवा त्याआधी कार्ड मेंबरने बँकेला भरणा करायचा आहे.

1.23 “एकूण थकबाकी” किंवा “एकूण देय रक्कम” चा अर्थ होतो कार्ड खात्यावर बँकेला देय असलेली एकूण थकबाकी ज्यामध्ये शुल्क, फी आणि इतर दुसऱ्या रक्कमेचा समावेश असते जे बिल चक्रात बँकेकडून वेळोवेळी आकारले जाऊ शकतात, परंतु इतकेच मर्यादित नाही. इथे दर्शवलेल्या उद्देश्यासाठी, हे स्पष्ट केले जाते कि बिल चक्राच्या प्रत्येक प्रसंगी कार्ड मेंबरला एकूण थकबाकी भरावी लागेल, मात्र, उल्लेखित कार्ड मेंबर प्रत्येक बिल चक्रासाठी एकूण थकबाकी पेक्षा कमी रक्कम भरू शकतात, परंतु किमान देय रक्कमेपेक्षा कमी कधीच नाही.

1.24 “तात्पुरती क्रेडिट मर्यादा” वाढ म्हणजे एखाद्या विशिष्ट उद्देश्यासाठी कार्ड मेंबर द्वारे विनंती करण्यात आलेली क्रेडिट मर्यादेतील वाढ. अशी वाढ एक विशिष्ट कालावधीसाठी केली जाते आणि कालावधीच्या शेवटी पूर्ववत केली जाते.

1.25 “वैध कार्ड” म्हणजे क्रेडिट कार्ड जे बँकेद्वारे जारी करण्यात आलेले आहे आणि कालबाह्य झालेले नाही, खराब झालेले नाही किंवा बँक किंवा कार्ड मेंबर द्वारे रद्द करण्यात आलेले नाही.

1.26 “वन टाईम पासवर्ड (“ओटीपी”)” म्हणजे बँकेद्वारे निर्मित प्रत्येकी एका-वेळचा पासवर्ड जो शॉर्ट मेसेज सर्विस (एसएमएस) द्वारे पाठवला जातो.

1.27 “ईएमवी पिन” “ईएमवी” म्हणजे बँके द्वारे जारी करण्यात आलेल्या क्रेडिट कार्डावर करायच्या व्यवहारांसाठी जारी करण्यात आलेला वैयक्तिक ओळख क्रमांक.

## 2. आरबीएल बँक क्रेडिट कार्ड

2.1 कार्ड मेंबरने इथे दिलेल्या आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सुचनांनुसार किंवा कोणत्याही वैधानिक संस्था किंवा बँकेच्या धोरणात वेळोवेळी बदल केल्यामुळे बँकेद्वारे सुधारणा करण्यात येणाऱ्या अटी आणि नियमांचे पालन करण्यासाठी सहमत झाले पाहिजे. lहे स्पष्ट केले जाते कि कार्ड फक्त तेव्हाच मान्य असेल जर वैध कार्डच्या मागील बाजूला रितसर सही केलेली आहे आणि कार्ड मेंबर द्वारे व्यापारी आस्थापनेला सादर केले जाते. कोणत्याही तृतीय पक्षाला ज्यामध्ये कोणतेही अनोळखी वैयक्तिक गट किंवा इंटरनेट पत्त्यांचा समावेश असून इतकेच मर्यादित नाही, सीवीसी2 क्रमांक उघड करताना कार्ड मेंबरने सावधगिरी बाळगली पाहिजे, कारण फसव्या व्यवहारांसाठी सीवीसी2 चा गैरवापर केला जाऊ शकतो.

2.2 कार्ड बँकेची मालमत्ता आहे आणि मागणी केल्यावर ताबडतोब बँकेला सादर करणे किंवा परत करणे आवश्यक आहे.

2.3 हे कार्ड अहस्तांतरणीय आहे आणि कार्ड मेंबरने हे संपूर्ण वेळ आपल्या स्वतःच्या नियंत्रणाखाली ठेवून त्याचा गैरवापर होण्यापासून सुरक्षा केली पाहिजे.

(i) भारताबाहेर परकीय चलनामध्ये क्रेडिट कार्डाचा वापर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांच्या परकीय चलन व्यवस्थापन कायदा (FEMA), 1999 च्या अधीन असेल. कार्डचा वापर प्रतिबंधित वस्तूंच्या खरेदीसाठी केला नाही पाहिजे, जसे लॉटरी तिकीटे, प्रतिबंधित किंवा निषिद्ध मासिके, जुगार खेळणे, आणि कॉल-बॅक सेवांसाठी देयभरणा.

(ii) कार्ड मेंबरने नेपाळ किंवा भुतानमध्ये परकीय चलनात भरणा करण्यासाठी कार्ड वापरू नये.

कार्ड मेंबर द्वारे परकीय चलन नियंत्रण नियमांचे पालन न केले गेल्यास, ज्यामध्ये कार्डावर ऑनलाइन परकीच चलन ट्रेडिंग किंवा संबंधित सट्टेबाजी करण्याचा समावेश असून हे इतकेच मर्यादित नाही, कार्ड मेंबर परकीय चलन व्यवस्थापन कायदा, 1999 आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियम आणि विनियमांनुसार कारवाईसाठी जबाबदार असू शकतो. बँक किंवा आरबीआयच्या सुचनांनुसार कार्ड मेंबरला आंतरराष्ट्रीय पातळीवर वैध क्रेडिट/ चार्ज कार्ड धारण करण्यापासून प्रतिबंधित केले जाऊ शकते.

2.4 कार्ड मिळाल्याचे स्वीकारल्यावर, आणि/किंवा कार्डच्या मागे सही करून, आणि/किंवा कार्डवर शुल्क आकारले जाऊन, प्राथमिक कार्ड मेंबर आणि/किंवा अतिरिक्त कार्ड मेंबरने, बँकेच्या स्व-विवेकबुद्धीनुसार वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, आरबीएल बँकेच्या कार्ड मेंबर कराराच्या अटी आणि नियम स्वीकारल्याचे समजण्यात येईल.

2.5 इलेक्ट्रॉनिक/इंटरनेट ट्रेडिंग पोर्टल्स द्वारे विदेशी मुद्रा व्यापारासाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष देय भरणा करण्यासाठी क्रेडिट कार्ड वापरले जाऊ शकत नाही. नियामक मार्गदर्शक तत्वांनुसार हे प्रतिबंधित आहे.

## 3. जारी करणे आणि दायित्व

3.1 बँक अशा अर्जदारांना/ बँकेच्या ग्राहकांना/ बँकेच्या क्रेडिट कार्ड उत्पादनात रुचि दर्शवणाऱ्या सामान्य जनतेच्या सदस्यांना क्रेडिट कार्ड जारी करेल जे वेळोवेळी लागू होणाऱ्या बँकेच्या क्रेडिट कार्ड जारी करण्याच्या धोरणात नमूद केल्यानुसार कार्ड जारी केले जाण्यासाठी पात्र आहेत. याशिवाय, कोणत्याही कार्ड मेंबरला दिलेली क्रेडिट मर्यादा आणि/किंवा रोख पैसे काढण्याची मर्यादा बँक तिच्या संपूर्ण आणि विशेष विवेकबुद्धीने ठरवेल. क्रेडिट मर्यादा आणि/किंवा रोख पैसे काढण्याची मर्यादा कार्ड मेंबरला विविध प्रसंगी कळविली जाते, ज्यामध्ये क्रेडिट कार्ड आणि कार्ड मेंबरच्या नियतकालिक स्टेटमेंटच्या वितरणाच्या वेळेचा समावेश आहे परंतु हे इतकेच मर्यादित नाही. नियतकालिक स्टेटमेंट निर्मितीच्या वेळी उपलब्ध क्रेडिट मर्यादा आणि/किंवा रोख पैसे काढण्याच्या मर्यादा स्टेटमेंटचा एक भाग म्हणून दिले जातात आणि बँक तिच्या विवेकबुद्धीनुसार कार्ड मेंबरच्या खात्याचे वेळोवेळी पुनरावलोकन करू शकते आणि अंतर्गत निकषांच्या आधारावर वरील मर्यादेत बदल करू शकते. जे कार्ड मेंबर त्यांची संबंधित क्रेडिट मर्यादा आणि/किंवा रोख पैसे काढण्याची मर्यादा वाढवू/बदलू इच्छितात, ते बँकेकडून मागितल्या जाणाऱ्या सर्व आवश्यक कागदपत्रांसह बँकेला विनंती लिहून करू शकतात. बँक, तिच्या विवेकबुद्धीनुसार आणि पुरवलेल्या अशा नवीन कागदपत्रांच्या आधारे, उक्त कार्ड मेंबरची क्रेडिट मर्यादा आणि/किंवा रोख पैसे काढण्याची मर्यादा बदलणे निवडू शकते.

3.2 या अटी व नियम क्रेडिट कार्ड स्वीकारणे/स्वाइप करणे आणि त्याचा वापर करणे यावर कार्ड मेंबरला बंधनकारक असतील.

3.3 कोणतीही सामग्री (मार्केटिंग सामग्रीसह) अर्जदारांना/ बँकेच्या ग्राहकांना/ क्रेडिट कार्ड घेऊ इच्छित असलेल्या सर्वसामान्य जनतेच्या सदस्यांना क्रेडिट कार्ड जारी करण्याची बँकेची ऑफर/वचन म्हणून ग्राह्य धरले जाऊ शकत नाही, यामध्ये ॲड-ऑन क्रेडिट कार्ड जारी करण्याच्या विनंती/अर्जांचा समावेश आहे.

3.4 बँकेद्वारे ॲड-ऑन क्रेडिट कार्ड जारी केलेले असल्यास, प्राथमिक आणि ॲड-ऑन कार्ड मेंबर द्वारे केलेल्या व्यवहारांमुळे बँकेला देय असलेल्या एकूण रक्कमेसाठी केवळ प्राथमिक कार्ड मेंबरच विशेषकरून जबाबदार असेल.

3.5 अर्जदार/ बँकेचे ग्राहक/ क्रेडिट कार्डमध्ये रुची असलेल्या सर्वसामान्य जनतेच्या सदस्यांना बँकेला अशी कागदपत्रे जमा करण्याची आवश्यकता असू शकते जे बँकेद्वारे तिच्या विवेकबुद्धीनुसार किंवा लागू कायद्यानुसार निश्चित केल्यानुसार आवश्यक असू शकतात.

## 4. कार्डची वैधता, समाप्ती आणि नूतनीकरण

4.1 कार्डच्या दर्शनी भागावर दर्शवलेल्या वर्षाच्या कॅलेंडर महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत कार्ड वैध आहे, जोपर्यंत ते बँकेद्वारे त्या अगोदर रद्द केले जात नाही. कार्ड मेंबरने वैधता कालावधीच्या बाहेर कार्ड वापरल्यास, त्यामुळे उद्भवू शकणाऱ्या कोणत्याही परिणामांसाठी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

4.2 समाप्ती झाल्यावर किंवा मुदतीआधी रद्द केल्यास, बँकेच्या विवेकबुद्धीनुसार कार्डचे नूतनीकरण केले किंवा बहाल केले जाऊ शकते. समाप्ती झाल्यावर, कार्ड चुंबकीय पट्टीवरून अर्धे कापून ते नष्ट केले गेले पाहिजे. तसेच, कृपया क्रेडिट कार्डावरील चिप (कोणतीही असल्यास) दोन तुकड्यांमध्ये कापून नष्ट करा.

4.3 जोपर्यंत कार्ड मेंबर कराराचे किंवा अन्यथा इथे दिल्यानुसार उल्लंघन करत नाही, बँक स्वतःहून कार्डच्या वैधतेचे नूतनीकरण करेल आणि सध्या वापरात असलेले कार्ड समाप्त होण्याआधी कार्ड मेंबरला एक नवीन कार्ड पाठवेल. नूतनीकरण केलेले कार्ड न मिळाल्यास, कार्ड मेंबर बँकेच्या नियुक्त ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधू शकतो किंवा कार्ड मेंबरला वेळोवेळी कळवलेल्या पत्त्यावर बँकेला पत्र लिहू शकतो.

4.4 कार्ड मेंबरला कार्डचे नूतनीकरण करायचे नसल्यास सध्या वापरत असलेल्या कार्डची मुदत संपण्याच्या किमान 30 दिवस आधी बँकेला कळवणे आवश्यक आहे. कार्ड मेंबर द्वारे कार्ड रद्द करण्याची अशी सूचना दिली न गेल्यास, कार्ड मेंबरच्या कार्ड खात्यात वार्षिक शुल्क (अर्जाच्या वेळी लागू होते त्यानुसार) आकारण्यात येईल आणि ते परत केले जाणार नाही.

4.5 क्रेडिट कार्डाच्या नूतनीकरण विनंतीसाठी पॅनचे तपशील सादर करणे अनिवार्य आहे. समाप्तीच्या आधी तुमच्या पॅनचे तपशील आम्हाला अद्यतनित न केले गेल्यास, त्याचे नूतनीकरण केले जाणार नाही. कार्डाच्या समाप्तीनंतर 90 दिवसांच्या आत पॅन तपशील प्राप्त न झाल्यास, अशी कार्डे कायमस्वरुपी बंद केली जातील.

## 5. अतिरिक्त कार्ड

5.1 एक कार्ड खात्यात अनेक अतिरिक्त कार्ड असू शकतात, सदर संख्या बँकेच्या विवेकबुद्धीनुसार निश्चित केली जाईल. अतिरिक्त कार्ड मेंबर 18 वर्षांपेक्षा अधिक वयाचा भारतीय रहिवासी असला पाहिजे आणि पालक, जोडीदार, मुलगा/मुलगी किंवा भाऊ किंवा बहीण या नात्याने प्राथमिक कार्ड मेंबरशी संबंधित असणे अनिवार्य आहे.

5.2 कार्ड मेंबरची विनंती/अधिकृतता प्राप्त झाल्यावर, बँक स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार अतिरिक्त कार्ड मेंबरला अतिरिक्त कार्ड जारी करू शकते.

5.3 अतिरिक्त कार्डावर केले गेलेल्या सर्व व्यवहारांसाठी आणि शुल्कांसाठी कार्ड मेंबर पूर्णपणे जबाबदार आणि उत्तरदायी असेल, जे भरणा करण्यासाठी त्यांच्या खात्याच्या स्टेटमेंटमध्ये समाविष्ट केले जातील. कार्ड मेंबर आणि अतिरिक्त कार्ड मेंबर सर्व शुल्कांसाठी बँकेला संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे जबाबदार असतील, भलेही खात्याचे मासिक स्टेटमेंट फक्त त्यांनाच पाठवले जातील. या अटी आणि नियम अतिरिक्त कार्ड मेंबर्सना सुद्धा बंधनकारक असतील.

5.4 कार्ड मेंबर बँकेला विनंती करून आणि अतिरिक्त कार्ड अर्ध्यात कापून ते बँकेला परत करून अतिरिक्त कार्डाची सुविधा मागे घेऊ शकतात. याची प्राप्ति झाल्यावर, बँक अतिरिक्त कार्ड रद्द करेल. अतिरिक्त कार्डावर झालेले सर्व व्यवहार परंतु जे बँकेद्वारे अतिरिक्त कार्ड प्राप्त होण्याआधी बिलात समाविष्ट केलेले नाही, ते कार्ड मेंबरसाठी वैध आणि बंधनकारक राहतील.

5.5 प्राथमिक कार्ड खाते कोणत्याही कारणास्तव बंद झाल्यास अतिरिक्त कार्डावरील सुविधा आणि विशेषाधिकार आपोआप काढून घेतले जातील.

## 6. कार्डाचा वापर

6.1 क्रेडिट कार्ड मिळाल्यावर, तुम्ही क्रेडिट कार्डच्या मागील बाजूस असलेल्या स्वाक्षरी पॅनेलवर ताबडतोब स्वाक्षरी केली पाहिजे.

6.2 कार्डचा वापर केवळ वस्तू आणि/किंवा सेवांच्या प्रमाणित वैयक्तिक किंवा अधिकृत खरेदीसाठी केला जाऊ शकतो.

6.3 शुल्क आकारतेवेळी कार्ड मेंबरने शुल्क पावती, रोख रक्कम काढल्याच्या पावती, किंवा मेल ऑर्डर कूपन वर सही करायली हवी आणि/किंवा गोळा केली पाहिजे. शुल्क पावती सही करण्यास अयशस्वी राहिल्यास कार्ड मेंबरला शुल्कांच्या जबाबदारीतून मुक्त केले जाणार नाही. कार्ड मेंबरने त्यांच्या शुल्क पावत्यांची प्रत कमीत कमी सहा महिने जपून ठेवली पाहिजे. तुमच्या विनंतीनुसार, बँक, स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार, प्रचलित दराने अतिरिक्त शुल्क भरण्याच्या अधीन, शुल्क पावतीच्या प्रती प्रदान करू शकते.

6.4 बँक, कोणत्याही वेळी, कोणतीही पूर्व सुचना न देता किंवा कोणतेही कारण स्पष्ट न करता कोणत्याही व्यापारी आस्थापनेतील शुल्काची अधिकृतता नाकारू शकते आणि/किंवा कार्ड वापरण्याची कार्ड मेंबरची क्षमता प्रतिबंधित किंवा स्थगित करू शकते आणि/किंवा कार्ड निलंबित किंवा रद्द करू शकते. बँक एटीएम, व्यापारी आस्थापनद्वारे किंवा स्वतःच क्रेडिट कार्ड पुन्हा ताब्यात घेऊ शकते/ठेवू शकते/क्रेडिट कार्डच्या थकबाकीचा आंशिक किंवा पूर्ण तत्काळ भरणा मागू शकते जर ती योग्यप्रकारे मानते कि क्रेडिट किंवा व्यवसायाच्या जोखमीच्या योग्य व्यवस्थापनासाठी असे करणे आवश्यक आहे किंवा कार्ड किंवा कार्ड खात्याचा गैरवापर होत आहे किंवा त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. कार्ड मेंबर वरील गोष्टींशी कोणताही विरोध किंवा आडमुठेपणा न करता सहमत आहे.

6.5 देय भरणायासाठी कार्ड खात्यावरील कोणत्याही व्यवहारासाठी बँकेद्वारे प्राप्त झालेली कोणतीही शुल्क पावती किंवा इतर भरणा मागणी हा निर्णायक पुरावा असेल की अशा शुल्क पावती किंवा इतर मागणीवर नोंद केलेली रक्कम कार्ड मेंबर द्वारे कार्डचा उपयोग करून खर्च झालेली होती. अशा प्रसंगी जेथे शुल्क पावती किंवा व्हाउचर उपलब्ध नाही जसे मेल ऑर्डर किंवा टेलिफोन ऑर्डर किंवा इलेक्ट्रॉनिक कॉमर्स (जसे इंटरनेट), आणि तुम्ही अशा व्यवहारावर आक्षेप घेता, तर कार्ड मेंबर सर्वप्रथम कार्डवरील थकीत रक्कम भरेल आणि थेट संबंधित व्यापारी आस्थापनेसोबत विवाद सोडवेल. त्यासाठी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

6.6 बँकेने वेळोवेळी सूचित केल्यानुसार काही उत्पादने आणि सेवांच्या खरेदीवर अधिभार लावला जाऊ शकतो. अधिभारचा भरणा करणे अनिवार्य आहे आणि ते वेळोवेळी बदलू शकतात. पेट्रोल पंपावरील व्यवहारांवरील अधिभार व्यवहाराच्या रक्कमेच्या 2.5% असेल जो किमान ₹ 10/- च्या अधीन आहे. रेल्वे तिकीटांच्या खरेदी/रद्द करण्यावरील अधिभार हा आयआरसीटीसी सेवा शुल्क + व्यवहाराच्या रकमेच्या 1.8% असेल.

6.7 कोणत्याही व्यापारी आस्थापनेने कार्ड स्वीकारण्यास नकार दिल्यास किंवा कार्डवर अधिभार आकारल्यास बँक जबाबदार राहणार नाही. मात्र, कार्ड मेंबरने अशा प्रकारे कार्ड स्वीकारण्यास नकार दिल्याबद्दल किंवा व्यापारी आस्थापनेद्वारे अधिभार आकारल्याबद्दल बँकेला कळवले पाहिजे, ही तक्रार बँकेने वेळोवेळी सूचित केलेल्या पत्त्यावर किंवा नियुक्त ग्राहक सेवा केंद्रावर केली पाहिजे.

6.8 बँक कोणत्याही प्रकारे व्यापारी माल, किंमत, दर, गुणवत्ता, प्रमाण, हमी, विशेषाधिकार, फायदे आणि सुविधांसाठी जबाबदार आणि/किंवा उत्तरदायी असणार नाही, यामध्ये व्यापारी आस्थापना आणि/किंवा तृतीय पक्ष पुरवठादाराकडून कार्ड मेंबरने खरेदी केलेल्या किंवा लाभ घेतलेल्या सेवांमधील कमतरता/उशीर, वितरण किंवा गैर-वितरणाचा समावेश आहे परंतु हे इतकेच मर्यादित नाही, ज्यात कार्ड मेंबर द्वारे केलेल्या कोणत्याही मेल ऑर्डरचा समावेश आहे. त्यामुळे उद्भवणारा कोणताही वाद कार्ड मेंबरने व्यापारी आस्थापना/तृतीय पक्ष पुरवठादारांसोबत थेट सोडवला पाहिजे आणि तसे करण्यात अयशस्वी झाल्यास कार्ड मेंबर बँकेच्या कोणत्याही दायित्वांपासून मुक्त होणार नाही.

6.9 कोणत्याही व्यापारी आस्थापनेच्या विरुद्ध कार्ड मेंबर द्वारे केलेला कोणताही दावा बँकेच्या विरुद्ध भरवाई किंवा प्रतिदाव्याच्या अधीन असणार नाही.

6.10 बँकेद्वारे आपल्या विवेकबुद्धीच्या आधारे, कार्ड मेंबरच्या प्रति कोणत्याही प्रकार जबाबदार न राहता, आणि कोणतेही कारण स्पष्ट न करता, कार्ड निलंबित/परत घेतले जाऊ शकते. कार्ड आणि हा कार्ड मेंबर करार संपुष्टात आल्याच्या परिणामस्वरुप याच्याशी संलग्न विशेषाधिकार, लाभ आणि सुविधा स्वतःच समाप्त होतील.

6.11 पुढे स्पष्ट केले जाते कि कार्ड मेंबर द्वारे कोणत्याही/सर्वच वस्तू/सेवांच्या खरेदीसाठी भरणा करावा लागेल, ज्यामध्ये विमान/रेल्वे तिकिटांचा समावेश असून ते इतकेच मर्यादित नाही, जसे स्टेटमेंटमध्ये दर्शवलेले आहे जेणेकरुन फायनांस किंवा फी शुल्क टाळले जातील, मग भलेही नंतर खरेदी रद्द करण्यात आली असेल. रद्दीकरणामुळे परताव्याची रक्कम फक्त तेव्हाच कार्ड खात्यात जमा केली जाईल (रद्दीकरण शुल्क वजा करून) जेव्हा अशा रद्दीकरणाची सुचना बँकेला प्राप्त होईल. कार्ड मेंबरला रोख परतावा दिला जाणार नाही. एक योग्य वेळेत खात्याच्या स्टेटमेंटमध्ये जमा रक्कम दाखवली न गेल्यास, कार्ड मेंबरने ताबडतोब बँकेला कळवले पाहिजे.

6.12 कार्ड मेंबर या कार्ड मेंबर कराराच्या अटी आणि नियम, कायदे, नियम, विनियमनांच्या उल्लंघनाच्या प्रसंगी कार्डाच्या वापराची संपूर्ण जबाबदारी स्विकारतो, आणि पुढे बँकेला नुकसान भरपाई देण्याचे आणि कोणतेही नुकसान, क्षति, व्याज, रूपांतरांची भरपाई करण्याचे वचन देतो, ज्यामध्ये इतर कोणत्याही आर्थिक शुल्क आणि बाह्य खर्च, खर्च, आणि परिणामांचा समावेश आहे जे बँकेला तुमच्या खात्यांवर आणि तुमच्या चूक/कमिशन आणि/किंवा निष्काळजीपणाच्या कृत्यामुळे होऊ किंवा सहन करावा लागू शकतो परंतु हे इतकेच मर्यादित नाही.

6.13 बँकेद्वारे कार्ड मेंबरला पुरवलेल्या सेवांवर आकारलेल्या अशा सर्व वैधानिक देय/शुल्क/कर्तव्यांसाठी देय भरण्यासाठी देखील कार्ड मेंबर जबाबदार आहे.

6.14 कार्ड मेंबर सहमत आहे आणि याद्वारे कार्ड मेंबरला परकीय चलनात आकारले गेलेले शुल्क भारतीय रुपयाच्या समतुल्य अशा दरात बदलण्यासाठी बँकेला अधिकृत करतो जे बँक वेळोवेळी स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार निश्चित करेल.

## 7. ईएमवी अटी आणि नियम

7.1 ईएमवी बँकेच्या प्रणालीत नोंदवलेल्या एसएमएस / ईमेल द्वारे किंवा नोंदणीकृत पत्त्यावर पाठवलेला पिन आहे. कार्ड मेंबरला बँक क्रेडिट कार्ड वापरून ऑफलाइन व्यवहार करता यावेत यासाठी ईएमवी आवश्यक आहे.

7.2 कार्ड मेंबर मान्य करतो आणि सहमत आहे की कोणत्याही ईएमवीच्या प्राप्तिमध्ये मोबाईल फोन सेवा प्रदाता किंवा इंटरनेट सेवा प्रदाता यांना प्रभावित करणाऱ्या कारकांमुळे आणि बँकेच्या नियंत्रणाबाहेरील इतर कारकांमुळे उशीर होऊ शकतो किंवा थांबवले जाऊ शकते. ईएमवीच्या डिलिवरीची बँक हमी देत नाही. कार्ड मेंबर बँकेला, तिचे संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि एजंट्स यांना वकीलांच्या फी सहीत कोणत्याही आणि सर्वच नुकसान किंवा हानी पासून मुक्त आणि निर्दोष ठेवण्यासाठी सहमत आहे, जे खालील कारणांमुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, पूर्णतः किंवा आंशिक प्रमाणात उद्भवू शकतात:

a. ईएमवीचे वितरण न होणे, उशीरा वितरण किंवा चुकीचे वितरण;

b. याच्या परिणामस्वरुप कार्ड मेंबरची बँक क्रेडिट कार्डावर व्यवहार करण्यास अपयश किंवा असमर्थता; आणि

c. ईएमवीच्या गैरवापर, अनधिकृत उपयोग, नुकसान किंवा चोरीमुळे कार्ड मेंबरला झालेली कोणतीही हानि किंवा नुकसान.

7.3 कार्ड मेंबरने ईएमवी च्या सुरक्षेशी संबंधित सर्व आवश्यकता, सूचना आणि तपशीलांचे पालन केले पाहिजे जे बँकेने कधीही आणि वेळोवेळी बँकेच्या संपूर्ण आणि पूर्ण विवेकबुद्धीने निर्धारित केलेले असू शकतात. वरील सर्वसामान्यतेविषयी कोणताही पूर्वग्रह न ठेवता, कार्ड मेंबर कोणत्याही क्षणी कार्ड मेंबरच्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीला ईएमवी वापरण्याची अनुमति किंवा परवानगी देणार नाही.

7.4 कार्ड मेंबर ईएमवी गोपनीय ठेवण्यासाठी जबाबदार आहे आणि इतर कोणत्याही पक्षासमोर ईएमवी उघड करणार नाही आणि इतर कोणत्याही पक्षाला/द्वारे ईएमवी आणि/किंवा पासवर्ड उघड करणे किंवा शोध टाळण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलतील. ईएमवी तसेच ज्या मोबाइल फोन किंवा उपकरणावर ईएमवी प्राप्त झाला आहे त्याच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी, आणि हे अनधिकृत वापरापासून सुरक्षित ठेवण्यासाठी कार्ड मेंबर जबाबदार आहे.

7.5 ईएमवी वापरून केलेल्या सर्व व्यवहारांसाठी कार्ड मेंबर जबाबदार असेल.

7.6 ईएमवी वापरून अधिकृत करण्यात आलेल्या व्यवहारांसाठी शुल्क परत मिळवण्यासाठी कार्ड मेंबर पात्र नसेल.

7.7 T24-तास ग्राहक सेवेला कॉल करुन कार्ड मेंबर बँकेला याची ताबडतोब सूचना देईल:

(i) जर बँकेकडे नोंदणीकृत असलेला कोणताही क्रमांक किंवा उपकरण हरवतो किंवा चोरीला जातो, किंवा नियोजित हेतूनुसार काम करण्यात अयशस्वी ठरतो,

(ii) जर कार्ड मेंबरला अशी शंका येण्याचे कोणतेही ज्ञान किंवा कारण असेल कि कोणत्याही ईएमवीच्या सुरक्षिततेशी किंवा गोपनीयतेशी तडजोड करण्यात आली आहे किंवा कोणत्याही ईएमवीचा अनधिकृत वापर झाला आहे किंवा

(iii) ईएमवीच्या निर्मिती आणि/प्राप्तिसाठी कार्ड मेंबर द्वारे वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही मोबाइल फोन किंवा इतर उपकरणाचा (जसा प्रसंग असेल) क्रमांक हरवला, बदली झाला आणि/किंवा बदलला असेल. वरीलपैकी कोणत्याही गोष्टींचे पालन करण्यात कार्ड मेंबर द्वारे कोणत्याही अपयशामुळे किंवा त्यासंबंधात उद्भवणाऱ्या सर्व नुकसानासाठी आणि परिणामांसाठी कार्ड मेंबर पूर्णपणे जबाबदार आणि उत्तरदायी असेल. कार्ड मेंबरच्या निष्काळजीपणामुळे ईएमवी चे नुकसान, चोरी किंवा गैरवापर झाल्यामुळे उद्भवणारी आर्थिक जबाबदारी आणि ती कार्डसदस्याने उचलली जाईल. याच्या परिणामस्वरुप कार्ड खाते रद्द केले जाऊ शकते.

7.8 ईएमवीचा गैर वापर होत आहे किंवा योग्य अधिकृततेशिवाय वापरले जात असल्याचे बँकेला वाटल्यास कोणतेही व्यवहार नाकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

7.9 बँकेला वेळोवेळी आपल्या एकमेव आणि संपूर्ण विवेकबुद्धीच्या आधारे कोणत्याही सूचनेशिवाय ईमवीचा उपयोग रद्द करण्याचा, किंवा कोणतेही कारण न देता, बदली किंवा सुधार करण्याच्या आवश्यकतेचा अधिकार आहे, म्हणून आणि त्याच्या परिणामस्वरुप कोणत्याही हानी किंवा नुकसानासाठी जबाबदार असणार नाही.

## 8. रोख रक्कम काढणे

8.1 कार्ड मेंबर बँकेच्या ऑटोमेटेड टेलर मशिन्स (एटीएम), निवडक भागीदार बँका आणि बँकेने वेळोवेळी तिच्या विवेकबुद्धीनुसार देऊ केलेल्या इतर ठिकाणं/ परवानगी असलेल्या आस्थापनांमधून रोख रक्कम काढण्यासाठी, आणि तसेच बँकेद्वारे वेळोवेळी परवानगी दिलेल्या इतर दुसऱ्या रोख समतुल्य व्यवहारांसाठी क्रेडिट कार्ड वापरू शकतो, ज्यामध्ये डिमांड ड्राफ्ट सुविधेचा समावेश असून इतकेच मर्यादित नाही. अशा सर्वच कोणत्याही रोख रक्कम काढण्यासाठी आणि रोख समतुल्य व्यवहारांसाठी, कार्ड मेंबरला परकीय चलन व्यवस्थापन कायदा, 1999 आणि त्या अंतर्गत निर्धारित नियमांच्या आणि आरबीआय व इतर सरकारी विभागांद्वारो सुचित सर्व कायदे, नियम आणि विनियमनांचे पालन करावे लागेल, ज्यामध्ये परकीय चलन कायद्याचा समावेश असून ते इतकेच मर्यादित नाही. कार्ड मेंबर कोणत्याही व्यक्तीला रोख रक्कम काढण्यासाठी बँकेने तुम्हाला दिलेला एटीएम पिन/कोडचा खुलासा करणार नाही. कार्ड मेंबर कोणत्याही व्यक्तीद्वारे हे शोधले जाणे रोखण्यासाठी शक्य तेवढी सगळी सावधगिरी घेईल.

8.2 कार्ड मेंबर बँकेने वेळोवेळी स्पष्ट केलेल्या या कळवलेल्या रोख रक्कम काढण्याच्या मर्यादेपर्यंत क्रेडिट कार्डावर रोख रक्कम काढू शकतात, मात्र हे उपलब्ध रोख रक्कम काढण्याची मर्यादा आणि रोख रक्कम व्यवहारासाठी लागू होणाऱ्या अशा अटी आणि नियमांच्या अधीन आहे.

8.3 शुल्क, आणि त्यावरील अटी व नियम कार्ड मेंबरला लेखी कळवल्या जातील. असे शुल्क बँकेच्या विवेकबुद्धीनुसार बदलू शकतात आणि पैसे काढण्याच्या तारखेपासून सेटलमेंटच्या तारखेपर्यंत आकारले जातील.

8.4 कसूर झाल्याचे आढळल्यास कसूर व्याज दर ताबडतोब लागू होईल. कार्ड मेंबरचे मासिक फायनांस शुल्क निश्चित केले जाताना विचारात घेतल्या जाणाऱ्या कारणांमध्ये कार्ड मेंबरच्या खात्याच्या वापर आणि कामगिरीच्या इतर सूचकांच्या अतिरिक्त, कोणतीही कसूर झाल्यास त्याच्या स्वरुपासह, कार्ड मेंबरच्या इतिहास, तुमच्या एकंदरीत क्रेडिट कामगिरीचा समावेश असेल.

## 9. इतर फी/शुल्क

9.1 कार्ड मेंबरने खर्च केलेले आणि/किंवा बँकेद्वारे आकारलेले सर्व शुल्क भरण्यासाठी सहमत झाले पाहिजे, ज्यामध्ये शुल्क (बदलीसाठी, आणि स्टेटमेंटच्या दुय्यम प्रतिसाठी), रोख रक्कम काढण्यावरील व्यवहार शुल्क, बाहेरील फीसाठी वसूली शुल्क, कायदेशीर खर्च, आणि इतर दुसऱ्या फी/शुल्क इत्यादीचा समावेश असून ते इतकेच मर्यादित नाही.

## 10. वस्तू आणि सेवा कर

10.1 कार्ड मेंबरने भारत सरकार द्वारे सूचित वस्तू आणि सेवा कर किंवा भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अशा कोणत्याही दराचा भरणा करण्यासाठी सहमत व्हायला पाहिजे जे वेळोवेळी लागू शुल्क, फायनांस शुल्क वर लावले जाऊ शकतात. वस्तू आणि सेवा कर कार्ड मेंबरच्या मासिक बिल स्टेटमेंटमध्ये दर्शवले जातील.

## 11. इशारे

11.1 कार्ड मेंबर याविषयी सहमत असले पाहिजे की बँक त्यांना त्यांच्या कार्ड खात्याच्या स्थितीविषयी माहिती देत राहील आणि वेळोवेळी त्यांना एसएमएस आणि/किंवा ईमेल किंवा इतर संपर्काच्या माध्यमातून संदेश पाठवून इतर दुसरी माहिती पुरवेल आणि त्यांना याबद्दल कोणताही आक्षेप नसेल. कार्ड मेंबर पुढे याविषयी सुद्धा सहमत आहे की बँक, तिच्या विवेकबुद्धीने, उल्लेखित सूचना/इशारा सेवांसाठी फी/शुल्क आकारणे निवडू शकते, ज्यावर कार्ड मेंबरला कोणताही आक्षेप असणार नाही.

### उपलब्धता

11.1 एसएमएस सुविधा सध्या फक्त भारतीय निवासी क्रेडिट धारकांसाठी उपलब्ध आहे ज्यांचे भारतातील आरबीएल बँक शाखांमध्ये खाते आहे.

11.2 एसएमएस सुविधा विशिष्ट सेल्युलर सर्विस प्रोवायडर्स (“सीएसपी”) द्वारे पुरवली जाते आणि म्हणून सीएसपी सेवा पुरवते अशा प्रदेशांमध्ये आणि भारतातील सीएसपीच्या सेवांच्या सदस्यांना उपलब्ध आहे.

11.3 क्रेडिट कार्डधारक सीएसपीच्या सेल्युलर सर्कलमध्ये किंवा अशा सीएसपीच्या रोमिंग नेटवर्कचा भाग असलेल्या सर्कलमध्ये असेल तरच क्रेडिट कार्डधारकाला अलर्ट पाठवले जातील.

11.4 आरबीएल बँक, शक्य असल्यास, व्याप्ती वाढवण्यासाठी अधिक सेल्युलर सेवा प्रदात्यांच्या मार्फत सुविधा पुरवू शकते.

11.5 वरील अटी त्या सर्व प्रोग्राम्ससाठी वैध असतील ज्या अंतर्गत आरबीएल बँक एसएमएस सुविधेचा वापर करून माहिती पाठवते.

## 12. लॉयल्टी प्रोग्राम आणि इतर प्रोग्राम

12.1 क्रेडिट कार्ड/को-ब्रँडेड क्रेडिट कार्डसोबत दिले जाणारे आरबीएल बँक (आरबीएल बँक) कार्ड रिवॉर्ड्स प्रोग्राम किंवा असेच इतर लॉयल्टी प्रोग्राम ("प्रोग्राम") पात्र आरबीएल बँक कार्ड मेंबरना ("कार्ड मेंबर") वेळोवेळी त्यांच्या आरबीएल बँक क्रेडिट कार्ड्सवर खर्च करून पॉइंट्स ("पॉइंट्स") जमा करू देते. अशा क्रेडिट कार्ड्सवर जमा झालेले पॉइंट्स आरबीएल बँक किंवा ज्याच्यासोबत को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड जारी केले गेले आहे अशा विविध प्रकारच्या रिवॉर्ड्ससाठी बदलले जाऊ शकतात.

12.2 प्रोग्राममधील सहभागी ऐच्छिक आहे. कार्ड मेंबर बँकेला सूचना पाठवून प्रोग्राममधून बाहेर पडू शकतात.

12.3 कार्ड मेंबर नेहमीप्रमाणे त्याचे/तिचे आरबीएल बँक कार्ड वापरणे सुरू ठेवू शकतो/शकते. प्रोग्राममधील सहभागासाठी वार्षिक शुल्क आकारले जाऊ शकतात जे आरबीएल बँक/ वाणिज्यिक किंवा व्यावसायिक संस्थेद्वारे निश्चित केले जातात ज्यांच्यासोबत वेळोवेळी को-ब्रँडेड कार्ड जारी केले जाते. नोंदणी तारीख - म्हणजे विद्यमान कार्ड मेंबरसाठी प्रोग्राम सुरु करण्याची तारीख आणि नवीन कार्ड मेंबरसाठी ती तारीख ज्या दिवशी आरबीएल बँकेद्वारे कार्ड खाते स्थापन केले जाते. नोंदणी वर्ष - म्हणजे नोंदणी तारखेपासून सुरु झालेला "कोणत्याही बारा-महिन्यांचा कालावधी".

12.4 मासिक बिल स्टेटमेंटमध्ये पॉइंट्स दर्शवले जातील.

12.5 आरबीएल बँकेने वेळोवेळी वगळलेले खर्च वगळता प्रोग्राम अंतर्गत क्रेडिट कार्डवर आकारलेले सर्व खर्च पॉइंट मिळविण्यास पात्र असतील. पॉइंट्स मिळविण्यासाठी सध्या पात्र नसलेल्या खर्चामध्ये खालील बाबींचा समावेश आहे, परंतु ते इतकेच मर्यादित नाही:

a. शिल्लक हस्तांतरण

b. रोख रक्कम काढणे

c. आर्थिक शुल्क (उदा. उशीरा देय भरणाचे शुल्क, धनादेश अमान्य शुल्क, सेवा शुल्क, व्यवहार शुल्क)

d. विवादित व्यवहार

e. पेट्रोल पंप/सर्विस स्टेशन्सवर केलेल्या कोणत्याही खरेदी, जोपर्यंत कार्ड मेंबरला अन्यथा विशेषकरून कळवलेले नसतील.

f. प्रोग्रामसाठी नोंदणी फीचा भरणा - मनीटॅप प्रोग्राम, रोख साठी

12.6 कार्ड मेंबरला त्याच्या/तिच्या नोंदणीच्या तारखेपूर्वी लागलेल्या कोणत्याही शुल्कांसाठी पॉइंट्स मिळू शकत नाहीत.

12.7 कार्ड मेंबर द्वारे क्रेडिट कार्डावर जमा केलेले पॉइंट्स रिडम्प्शनच्या वेळी त्यांच्या इतर क्रेडिट कार्डच्या पॉइंट्ससोबत एकत्रित केले किंवा वापरले जाऊ शकत नाही, किंवा इतर दुसऱ्या कस्टमर लॉयल्टी प्रोग्राममध्ये हस्तांतरित केले जाऊ शकत नाही जोपर्यंत आरबीएल बँकेद्वारे तसे विशेषपणे कळवले जात नाही.

12.8 जमा झालेल्या पॉइंट्सना रोख आणि/किंवा कोणतेही आर्थिक मूल्य नाही जोपर्यंत बँकेने स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार काही निवडक क्रेडिट कार्ड/त्यांच्या संबंधित कार्ड मेंबरना, विशिष्ट खर्चावर आणि त्याद्वारे जमा झालेल्या पॉइंट्सवर रोख आर्थिक मूल्य देणे निवडलेले नाही.

12.9 जर कोणतीही रक्कम जमा केली गेली असेल, ज्यामध्ये परत केलेल्या वस्तू किंवा सेवा आणि बिलिंग विवादामुळे उद्भवलेल्या परताव्याचा समावेश आहे, तर अशा पॉइंट्समध्ये समायोजन केले जाईल. जर एखादा विवादित व्यवहार कार्ड मेंबरच्या पक्षात सोडवला गेला असेल किंवा जेथे व्यवहार उलट केला गेला आहे, तेव्हा त्या प्रमाणात पॉइंट्स सुद्धा उलट केले जातील आणि कार्ड मेंबरच्या खात्यात जमा केले जातील, जर आधीच जमा केलेले नसतील. त्याचप्रमाणे, वस्तूचा परतावा किंवा विवाहित व्यवहार कार्ड मेंबरच्या विरुद्ध सोडवला गेला असेल, तर त्या प्रमाणातील पॉइंट्स कार्ड मेंबरच्या खात्यातून कापले/वजा केले जातील, जर आधीच जमा केलेले असतील. रिडम्प्शनच्या वेळी, रीडीम केलेले पॉइंट्स कार्ड खात्यात जमा झालेल्या पॉइंट्समधून आपोआपपणे वजा केले जातील.

12.10 आरबीएल बँक, आपल्या सर्वोत्तम प्रयत्नांच्या आधारे, क्रेडिट कार्डाच्या संबंधित खात्याच्या स्टेटमेंटमध्ये प्राथमिक कार्ड मेंबरला वरील मासिक स्टेटमेंटसाठी अखेरच्या तारखीच्या आधी ताबडतोब जमा केले गेलेल्या पॉइंट्सच्या संख्येविषयी कळवेल.

12.11 कार्ड मेंबर द्वारे स्वेच्छेने क्रेडिट कार्ड बंद केले असल्यास किंवा इतर कोणत्याही कारणासाठी रद्द केले गेल्यास, क्रेडिट कार्ड रद्द केल्यानंतर कोणतेही थकीत रिवॉर्ड पॉइंट्स आपोआप समाप्त होतील आणि गमावले जातील. जर कोणत्याही कारणामुळे क्रेडिट कार्ड आरबीएल बँकेद्वारे अवरुद्ध किंवा निलंबित केले जाते, तर जमा झालेले पॉइंट्स गमावले जातील परंतु क्रेडिट कार्डाचा वापर पुन्हा पूर्ववत केल्यास आरबीएल बँकेच्या विवेकबुद्धीनुसार ते पुन्हा स्थापित केले जाऊ शकतात.

12.12 पॉइंट्सची गणना, समाप्ती, रद्दीकरण, जप्ती, जमा, कपात, आणि पुन्हा-संयचनविषयी आरबीएल बँकेचा निर्णय अंतिम, निर्णायक आणि कार्ड मेंबरसाठी बंधनकारक असेल.

12.13 रीडीम करण्यासाठी उपलब्ध पॉइंट्सचा अर्थ आहे ते पॉइंट्स ज्यांना कार्ड मेंबर द्वारे रिवॉर्ड कॅटलॉगमधून माल (वस्तू/सेवा) साठी किंवा व्यापारी आस्थापनेकडे उपलब्ध रिवॉर्ड सर्टिफिकेसाठी किंवा इतर कोणत्याही प्रकारे, जे संबंधित क्रेडिट कार्डसाठी विशिष्ट असेल, रीडीम केले जाऊ शकतात ज्यामध्ये त्वरित रीडम्प्शन, रोख रीडम्प्शन, आणि गिफ्ट व्हाउचर्सचा समावेश असून ते इतकेच मर्यादित नाही.

12.14 कार्ड मेंबर समजतो की बँक, कार्ड मेंबरला कळवल्यानंतर, त्यांच्या कोणत्याही प्रोग्राममध्ये कार्ड मेंबरच्या सहभागासाठी रक्कम कापू शकते (इथून पुढे "रक्कम" म्हटले जाईल). अशी रक्कम कापल्यानंतर, कार्ड मेंबरच्या कार्डच्या वापराच्या संदर्भात बँकेद्वारे पाठवलेल्या स्टेटमेंटच्या प्राप्तिच्या 7 दिवसांच्या आत, जर कार्ड मेंबरल बँकेला प्रोग्राममधील सहभागी न होण्यासाविषयी लिखित स्वरुपात कळवतो, तर बँकेद्वारे सदर रक्कम कार्ड मेंबरच्या खात्यात जमा केली जाईल.

12.15 कार्डमेंबला एक स्टेटमेंट चक्रामध्ये कार्ड मेंबर द्वारे कमावलेल्या पॉइंट्सची संख्या कळवण्यात येईल. हे रिवॉर्ड पॉइंट्स रीडीम करण्याचा दर आणि पद्धती बँकेच्या विवेकबुद्धीवर अवलंबून असेल, हा दर कोणत्याही पूर्व सुचनेशिवाय कोणत्याही क्षणी बदलला जाऊ शकतो.

12.16 कार्ड सुविधा काढून किंवा रद्द केली गेल्यास किंवा कार्ड खाते थकीत खाते म्हणून दाखवले गेल्यास, संबंधित तारखेला पॉइंट्सच्या संचय किंवा रीडम्प्शनची परवानगी दिली जाणार नाही.

12.17 कार्ड मेंबर पॉइंट्स दुसऱ्या व्यक्तीला हस्तांतरित करू शकत नाही किंवा तुमच्याकडे असलेल्या बँकेच्या इतर कोणत्याही कार्डसोबत ते एकत्रित करू शकत नाही. मात्र, बँक, तिच्या विवेकबुद्धीनुसार, काही प्रसंगी विशिष्ट योजनांसाठी पॉइंट्सच्या हस्तांतरणाची परवानगी देऊ शकते आणि याविषयी वेळोवेळी कार्ड मेंबरला कळवेल.

12.18 बँकेची पॉइंट्सची गणना अंतिम, निर्णायक आणि कार्ड मेंबरसाठी बंधनकारक असेल आणि कोणत्याही कारणास्तव वादग्रस्त किंवा प्रश्न विचारण्यास जबाबदार राहणार नाही.

12.19 24 महिन्यांमध्ये जमा झालेले पॉइंट्स कार्ड मेंबर द्वारे रीडीम न केले गेल्यास ते कालबाह्य होतील आणि जप्त केले जातील.

12.20 पॉइंट्स रीडीम्प्शन करण्याची विनंती मिळाल्याच्या वेळी क्रेडिट कार्ड आरबीएल बँकेकडून थकीत, निलंबित, अवरुद्ध, रद्द किंवा समाप्त करण्यात आलेले नसावे.

12.21 जमा झालेले पॉइंट्स फक्त प्राथमिक कार्ड मेंबर द्वारे रीडीम केले जाऊ शकतात, आणि अतिरिक्त कार्ड मेंबर द्वारे नाही.

12.22 प्रोग्राम कॅटलॉग आणि आरबीएल बँकेद्वारे वेळोवेळी जारी केले गेलेल्या इतर मेलर्स मध्ये वर्णन केल्यानुसार, विविन्न बक्षिसांसाठी सहभागी व्यापारी आस्थापनेकडे पॉइंट्स रीडीम केले जाऊ शकतात, उदा. वस्तू, खरेदी, डायनिंग, प्रवास, मनोरंजन. फी माफी, आर्थिक सेवा, क्रेडिट कार्ड अपग्रेड्स.

12.23 रीडम्प्शनची विनंती करण्यासाठी कार्ड मेंबरने www.rblrewards.com वर नोंदणी करणे आवश्यक आहे. कार्ड मेंबर त्यांच्या संबंधित पॉइंट्सच्या रीडम्प्शनची स्थिती आणि पर्याय पाहण्यासाठी सुद्धा वेबसाइट पाहू शकतात.

12.24 रीडम्प्शन सर्टिफेक्ट्स/ व्हाउचर्स किंवा भेटवस्तूंच्या वितरणासाठी झालेल्या कोणत्याही उशीर किंवा नुकसानासाठी आरबीएल बँक जबाबदार असणार नाही.

12.25 रिडीम केलेले पॉइंट्स इतर बक्षिसांसाठी किंवा कोणत्याही परिस्थितीत रोख किंवा क्रेडिटसाठी परत करण्यायोग्य, बदलण्यायोग्य किंवा हस्तांतरण करण्यायोग्य नाहीत, आणि असे रीडीम केलेले पॉइंट्स पुन्हा पॉइंट्समध्ये रुपांतर केले जाऊ शकत नाही. एकदा दुसऱ्या पार्टनर लॉयल्टी प्रोग्रामसाठी अदलाबदल केल्यानंतर, कोणतेही असल्यास, पॉइंट्स परत हस्तांतरित केले जाऊ शकत नाहीत.

12.26 सर्व पुरस्कार उपलब्धतेच्या अधीन आहेत आणि यावर काही निर्बंध लागू होऊ शकतात.कार्ड मेंबरला जारी केलेल्या रीडम्प्शन सर्टिफिकेट्स/व्हाउचर्स मध्ये प्रत्येक बक्षिसाठी रीडम्प्शन प्रक्रिया आणि अतिरिक्त अटी आणि नियम नमूद केले जातील.

12.27 कोणतेही अतिरिक्त जेवण, वाहतूक, निवास व्यवस्था, कुरिअर किंवा कोणत्याही बक्षीसाच्या पूर्ततेच्या संदर्भात होणारे इतर खर्च ही कार्ड मेंबरची संपूर्ण जबाबदारी असेल.

12.28 जेवणाचे, प्रवासासाठी किंवा हॉटेलच्या निवासासाठी रीडम्प्शन सर्टिफिकेट जारी करणे हे आरक्षण होत नाही.सर्व आरक्षण करण्यासाठी आणि सहभागी व्यापारी आस्थापनेला तो/ती रिडीम करणार असलेल्या बक्षीसांची सूचना देण्यासाठी कार्ड मेंबर जबाबदार आहे.

12.29 क्रेडिट कार्डाच्या वापराद्वारे सक्रिय करण्यात आलेले इतर आरबीएल बँक लाभ, प्रोग्रामच्या अंतर्गत बक्षिस म्हणून प्राप्त झालेल्या वस्तू किंवा सेवांना लागू होत नाही.

12.30 आरबीएल बँक कोणत्याही परिस्थितीत पॉइंटने रीडीम केलेल्या उत्पादन आणि/किंवा सेवांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही, ज्यामध्ये कोणताही दोष किंवा कमतरता किंवा पॉइंट्सच्या वापर किंवा वापर न केल्याने उद्भवलेला कोणताही दावा, जेवण, प्रवास किंवा हॉटेल निवासासाठी रीडम्प्शन सर्टिफिकेटचा वापर, किंवा पॉइंट्सच्या रीडम्प्शन द्वारे प्राप्त केलेल्या कोणत्याही उत्पादन/सेवांचा वापर, टिकाऊपणा, व्यापारक्षमता यांचा समावेश असून हे इतकेच मर्यादित नाही.

12.31 प्रोग्राममधील पॉइंट्सच्या कमाई आणि रीडम्प्शन संबंधित फसवणूक आणि/किंवा दुरुपयोगाच्या परिणामस्वरुप पॉइंट्स जप्त केले जातील तसेच क्रेडिट कार्ड समाप्त आणि रद्द केले जाईल.

12.32 बक्षिसांच्या रीडम्प्शनवर कार्ड मेंबर द्वारे पुरवलेली माहिती आरबीएल बँक किंवा तिच्या व्यापारी आस्थापनांद्वारे, कार्ड मेंबरकडून लिखित किंवा इतर प्रकारे कोणतीही परवानगी न घेता, प्रशासकीय उद्देश्यांसाठी वापरली जाऊ शकते.

12.33 कोणतेही कर किंवा इतर दायित्वे किंवा सरकार, इतर कोणतेही प्राधिकरण, संस्था किंवा इतर सहभागी व्यापारी आस्थापनेला देय असलेले शुल्क, जे वर नमूद केल्याप्रमाणे किंवा अन्यथा पॉइंट्सच्या रीडम्प्शनवर कार्ड मेंबरला उद्भवू शकतात किंवा जमा होऊ शकतात, हे फक्त कार्ड मेंबरची जबाबदारी असेल.

12.34 आरबीएल बँक कार्ड मेंबरला कोणतीही सूचना न देता, कोणत्याही क्षणी, बक्षिसे, बक्षिसाच्या अटी किंवा पॉइंट्सच्या गणांचा आधार, किंवा प्रोग्रामच्या अटी आणि नियम रद्द करण्याचा, बदलण्याचा किंवा प्रतिस्थापित करण्याचा अधिकार सुरक्षित ठेवते. आरबीएल बँक, कमावलेल्या पॉइंट्सच्या प्रति कोणत्याही दायित्वाशिवाय, कोणत्याही क्षणी जसे योग्य वाटेल जसे प्रोग्राम निलंबित किंवा समाप्त करू शकते.

12.35 आरबीएल बँक, प्रोग्रामच्या अंतर्गत सहभागी व्यापारी आस्थापना/को-ब्रँडेड वाणिज्यिक किंवा व्यावसायिक संस्थांद्वारे पुरवलेल्या/पुरवल्या जाऊ शकणाऱ्या वस्तू आणि/किंवा सेवांच्या प्रकार, गुणवत्ता किंवा तुंदुरुस्तीच्या संदर्भात, एकतर स्पष्ट किंवा अस्पष्ट, हमी किंवा प्रतिनिधित्व देत नाही. वस्तूसोबत, जेथे लागू असेल तेथे, निर्मात्याकडील हमीची माहितीसह असू शकते आणि कोणतेही दावे केवळ निर्माता किंवा सेवा प्रदाता किंवा को-ब्रँडेड वाणिज्यिक किंवा व्यावसायिक संस्थेकडे केले गेले पाहिजेत.

12.36 प्रोग्राम अंतर्गत बक्षिसे म्हणून मिळालेल्या वस्तू किंवा सेवांसंबंधीचा कोणताही विवाद कार्ड मेंबर आणि वस्तू किंवा सेवांचा पुरवठा करणारी सहभागी व्यापारी आस्थापना यांच्यात निकाली काढला जाईल. आरबीएल बँक अशा विवादांचे निराकरण करण्यासाठी किंवा स्वतः विवादासाठी कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

12.37 प्रत्येक कार्यक्रम वेगळ्या विशिष्ट अटी आणि नियमांद्वारे नियंत्रित केला जाईल (इथून यापुढे “प्रोग्रामच्या अटी आणि नियम” म्हटले जाईल). तथापि, असा प्रोग्रामच्या अटी आणि नियम कार्ड मेंबर करारामध्ये कोणत्याही प्रकारे सुधारणा करणार नाही, आणि कोणतीही संदर्भित अट परंतु त्यात तिची व्याख्या केलेली नाही ती कार्ड मेंबर करारानुसार स्पष्ट केली जाऊ शकते.

12.38 आरबीएल बँक या प्रोग्रामच्या संदर्भात कोणत्याही बाबतीत किंवा कोणत्याही बक्षिसाच्या पुर्ततेच्या संदर्भात कार्ड मेंबर द्वारे कोणत्याही मौखिक किंवा इलेक्ट्रॉनिक सुचना किंवा चौकशीला प्रतिसाद देण्यासाठी सद्भावनेने कार्य करते. कार्ड मेंबरला आरबीएल बँकेच्या अशा कोणत्याही सद्भावनेच्या कृतीसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणतीही हानि, नुकसान, उत्तरदायित्व, खर्च इत्यादीचा दावा करण्याचा किंवा आरोप करण्याचा अधिकार असणार नाही आणि कार्ड मेंबर आरबीएल बँकेला त्या संदर्भात भरपाईपासून मुक्त ठेवेल आणि पूर्णपणे निरपराध ठेवेल.

12.39 वर असे उल्लेखित असले तरीही, बँक फक्त काही निवडक कार्ड मेंबरना काही मूल्य-वर्धित प्रोग्राम सुद्धा पुरवते. हे स्पष्ट केले जाते की उल्लेखि प्रोग्राम फक्त विशिष्ट नियम आणि अटींच्या अधीन आहेत आणि फक्त काही निवडक ग्राहकांना बँकेद्वारे तिच्या विवेकबुद्धीनुसार दिले गेलेले मूल्य-वर्धित लाभ आहेत.

## 13. 24 तासी ग्राहक सेवा

13.1 बँक कार्ड मेंबरला माहिती उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्यांच्या कार्ड खात्यावर दूरध्वनीवरून सूचना देऊन व्यवहार करण्यासाठी माहिती आणि सुविधा पुरवेल. बँक हे एकतर मॅन्युअल किंवा एक स्वयंचलित प्रमाणील द्वारे स्वीकारू शकते. मात्र, बँक तिच्या विवेकबुद्धीनुसार, टेलिफोनवर दिल्या/केले जाऊ शकणाऱ्या माहिती/व्यवहाराच्या स्वरुपाविषयी निर्णय घेऊ शकते. बँक कार्ड मेंबरच्या विनंतीवर प्रक्रिया करण्याआधी त्यांची ओळख अधिकृत करण्याचा अधिकार सुद्धा राखून ठेवते.

13.2 कार्ड मेंबरने सहमत झाले पाहिजे कि अशा सुचनांच्या संदर्भात बँक सद्भावनेने कृती करत असताना ते बँकेला उत्तरदायी ठरवणार नाही.

13.3 बँक तिच्या विवेकबुद्धीनुसार अशा सुचना टेप किंवा रेकॉर्ड करू शकते आणि कोणत्याही कार्यवाहीमध्ये पुराव्यासाठी अशा टेलिफोनिक सूचनांच्या प्रतिलेखांवर अवलंबून राहू शकते.

13.4 कार्ड मेंबरच्या विनंतीवर बँक कार्ड खात्याच्या संदर्भात ईमेल (बँकेकडे नोंदवलेल्या ईमेलवर) द्वारे आर्थिक माहिती पाठवू शकते जे खाजगी किंवा गोपनीय स्वरुपाची असू शकते आणि अशी माहिती कोणत्याही तृतीय पक्षाला कळल्यास ते कोणत्याही प्रकारे बँकेला जबाबदार ठरवणार नाही.

13.5 अशा सुचनांचे पालन करताना, बँक सर्वोत्तम प्रयत्नांच्या आधारे असे करेल आणि त्यांच्या कोणत्याही सुचनांवर ताबडतोब किंवा पूर्णपणे कृती करण्यासाठी बँकेच्या वतीने कोणत्याही उशीर किंवा असमर्थतेसाठी जबाबदार राहणार नाही.

13.6 बँकेकडे अशा सूचनांचे पालन न करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे जेथे बँकेकडे सूचना खऱ्या नाहीत असे मानण्याचे किंवा सुविधा मागे घेण्याचे किंवा निलंबित करण्याचे कारण असेल.

13.7 जर बँकेद्वारे करण्यात आलेल्या कोणत्याही व्यवहारांच्या वर्णनात किंवा तपशीलांमध्ये एखादी विसंगति आहेत, तर बँकेकडून पावती मिळाल्यापासून तीस (30) दिवसांच्या आत कार्ड मेंबरने बँकेला विसंगतीची माहिती देणे बंधनकारक असेल. बँकेने कोणत्याही प्रश्नाचे उत्तर म्हणून दिलेल्या प्रतिसादाने कार्ड मेंबरचे समाधान न झाल्यास, कार्ड मेंबरकडे सदर प्रकरण बँकेच्या उपलब्ध एस्केलेशन यंत्रणेकडे किंवा बाह्य मंचाकडे म्हणजे बँकिंग लोकपालकडे पाठविण्याचा पर्याय असतो. कार्डसदस्याकडून असभ्य आणि अशिष्ट भाषेचा वापर स्वीकार्य असणार नाही आणि जसे प्रसंग आढळल्यास, बँक आवश्यकतेनुसार संबंध संपुष्टात आणण्यासह आवश्यक कार्यवाही सुरू करू शकते.

13.8 बँकेद्वारे सदर सुविधा दिली जाण्याचा विचार करता, ही सुविधा वापरण्याच्या परिणामस्वरुप किंवा कारणास्तव बँकेला झालेल्या, सहन करावे लागलेल्या किंवा उद्भवलेल्या सर्व कारवाई, दावे, मागणी, कार्यवाही, हानी, नुकसान, खर्च, शुल्क आणि खर्चाची कार्ड मेंबर भरपाई करेल आणि अशा सर्वांच्या विरुद्ध बँकेचा नुकसानभरपाई पासून बचाव करेल.

## 14. इंटरनेट बँकिंग

14.1 कार्ड मेंबरने सहमत झाले पाहिजे कि कोणतेही इंटरनेट व्यवहार करताना, कोणतेही परकीय चलनाचा जावक खर्च करताना तो परकीच चलन व्यवस्थापन कायदा 1999, माहिती तंत्रज्ञान कायदा 200 आणि इतर लागू कायद्यांना अनुसरुनच असला पाहिजे ज्यामध्ये त्याअंतर्गत कोणत्याही नियम, विनियम, सूचनांचा आणि वेळोवेळी लागू होणाऱ्या कोणत्याही इतर कायद्यांचा समावेश आहे. बँक, तिच्या विवेकबुद्धीनुसार, कोणत्याही व्यक्तीद्वारे खात्याच्या माहितीचा अनधिकृत आणि बेकायदेशीर वापरापासून सुरक्षा करण्यासाठी कार्ड मेंबर द्वारे केलेले काही इंटरनेट व्यवहार नाकारू शकते.

14.2 या सुविधेच्या वापरासाठी कार्ड मेंबरला एक विशिष्ट वैयक्तिक ओळख क्रमांक (पिन) सुद्धा दिला जाऊ शकतो. उल्लेखित क्रमांकांच्या सुरक्षेसाठी कार्ड मेंबर स्वतः जबाबदार असेल आणि उल्लेखित क्रमांक कोणत्याही व्यक्तीसोबत शेयर किंवा उघड करणार नाही.

14.3 कार्ड मेंबरने हे मान्य केले पाहिजे की ते अशा कोणत्याही गेमिंग किंवा अश्लीलतेशी संबंधित वेबसाइटवर जाण्यासाठी कार्ड/कार्ड क्रमांकाचा वापर करणार नाही, जे भारत सरकार द्वारे प्रतिबंधित आणि बेकायदेशीर घोषित केले आहेत. असे केल्याने, त्यांच्या विरुद्धा कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी ते उत्तरदायी ठरू शकतात आणि यासाठी बँक जबाबदार असणार नाही.

14.4 वेबसाइट्सवर उपलब्ध असलेली माहिती सामग्री बदलाच्या अधीन आहे. बँकेच्या वेबसाइटचा अनधिकृत वापर ज्यामध्ये बँक प्रणालीमध्ये प्रवेश करण्याचा समावेश असून ते इतकेच मर्यादित नाही, पासवर्डचा गैरवापर किंवा वेबसाइटवर पोस्ट केलेल्या कोणत्याही माहितीचा गैरवापर पूर्णपणे प्रतिबंधित आहे. असे करताना, कार्ड मेंबर माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000 आणि त्यावेळी लागू असलेल्या इतर कायद्यांच्या अंतर्गत तरतूदींच्या अंतर्गत कायदेशीर कारवाईसाठी जबाबदार असेल.

14.5 बँक इंटरनेट बँकिंग सुविधा देत असण्याचा विचार करता, ही सुविधा वापरण्याच्या परिणामस्वरुप किंवा कारणास्तव बँकेला झालेल्या, सहन करावे लागलेल्या किंवा उद्भवलेल्या सर्व कारवाई, दावे, मागणी, कार्यवाही, हानी, नुकसान, खर्च, शुल्क आणि खर्चाची कार्ड मेंबर भरपाई करेल आणि अशा सर्वांच्या विरुद्ध बँकेचा नुकसानभरपाई पासून बचाव करेल.

14.6 कोणतेही कारण न सांगता किंवा कोणतीही सूचना न देता कोणत्याही वापरकर्त्याचे ॲक्सेस समाप्त करण्याचा अधिकार बँकेने राखीव ठेवलेला आहे.

## 15. वन टाईम पासवर्ड ("ओटीपी") अटी आणि नियम

15.1 ओटीपीही हा बँकेच्या प्रणालीत नोंदवलेल्या मोबाइल फोन क्रमांकावर एसएमएस द्वारे पाठवलेला एक वन-टाईम पासवर्ड आहे. इंटरनेट द्वारे किंवा मोबाइल बँकिंग द्वारे क्रेडिट कार्ड वापरून व्यवहार करू शकण्यासाठी ओटीपी अत्यावश्यक आहे. ओटीपी अशा व्यवहारांसाठी तयार केला जातो जेथे क्रेडिट कार्ड उपलबध नसते म्हणजेच व्यवहार इंटरनेट वर, आयवीआर इत्यादी द्वारे केला जातो आणि तो त्याच्या निर्मितीच्या वेळेपासून फक्त 15 मिनिटांच्या कालावधीसाठी वैध असतो.

15.2 कार्ड मेंबर मान्य करतो आणि सहमत आहे की कोणत्याही ओटीपीच्या प्राप्तिमध्ये मोबाईल फोन सेवा प्रदाताला प्रभावित करणाऱ्या कारकांमुळे आणि बँकेच्या नियंत्रणाबाहेरील इतर कारकांमुळे उशीर होऊ शकतो किंवा थांबवले जाऊ शकते. ओटीपीच्या डिलिवरीची बँक हमी देत नाही. कार्ड मेंबर बँकेला, तिचे संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि एजंट्स यांना वकीलांच्या फी सहीत कोणत्याही आणि सर्वच नुकसान किंवा हानी पासून मुक्त आणि निर्दोष ठेवण्यासाठी सहमत आहे, जे खालील कारणांमुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, पूर्णतः किंवा आंशिक प्रमाणात उद्भवू शकतात:

a. ओटीपीचे वितरण न होणे, उशीरा वितरण किंवा चुकीचे वितरण;

b. याच्या परिणामस्वरुप बँक क्रेडिट कार्डावर व्यवहार करण्यास अपयश किंवा असमर्थता; आणि

c. ओटीपीच्या गैरवापर, अनधिकृत उपयोग, नुकसान किंवा चोरीमुळे झालेली कोणतीही हानि.14.3 कार्ड मेंबरने ओटीपीच्या सुरक्षेशी संबंधित सर्व आवश्यकता, सूचना आणि तपशीलांचे पालन केले पाहिजे जे कधीही आणि वेळोवेळी संपूर्ण आणि पूर्ण विवेकबुद्धीने निर्धारित केलेले असू शकतात. वरील सर्वसामान्यतेविषयी कोणताही पूर्वग्रह न ठेवता, कार्ड मेंबर कोणत्याही क्षणी दुसऱ्या व्यक्तीला ओटीपी वापरण्याची अनुमति किंवा परवानगी देणार नाही.

15.3 ओटीपी गोपनीय ठेवण्यासाठी कार्ड मेंबर जबाबदार असेल. Tकार्ड मेंबर इतर कोणत्याही पक्षासमोर ओटीपी उघड करणार नाही आणि इतर कोणत्याही पक्षाला/द्वारे ओटीपी आणि/किंवा पासवर्ड उघड करणे किंवा शोध टाळण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलतील.ओटीपी तसेच ज्या मोबाइल फोन किंवा उपकरणावर ओटीपी प्राप्त झाला आहे त्याच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी, आणि हे अनधिकृत वापरापासून सुरक्षित ठेवण्यासाठी कार्ड मेंबर जबाबदार आहे.

15.4 ओटीपी वापरून केलेल्या सर्व व्यवहारांसाठी कार्ड मेंबर जबाबदार असेल.

15.5 24-तास ग्राहक सेवेला कॉल करुन कार्ड मेंबर बँकेला याची ताबडतोब सूचना देईल:

a. जर बँकेकडे नोंदणीकृत असलेला कोणताही क्रमांक किंवा उपकरण हरवतो किंवा चोरीला जातो, किंवा नियोजित हेतूनुसार काम करण्यात अयशस्वी ठरतो,

b. जर कार्ड मेंबरला अशी शंका येण्याचे कोणतेही ज्ञान किंवा कारण असेल कि कोणत्याही ओटीपीच्या सुरक्षिततेशी किंवा गोपनीयतेशी तडजोड करण्यात आली आहे किंवा कोणत्याही ओटीपीचा अनधिकृत वापर झाला आहे किंवा

c. ओटीपीच्या निर्मिती आणि/प्राप्तिसाठी कार्ड मेंबर द्वारे वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही मोबाइल फोन किंवा इतर उपकरणाचा (जसा प्रसंग असेल) क्रमांक हरवला, बदली झाला आणि/किंवा बदलला असेल. वरीलपैकी कोणत्याही गोष्टींचे पालन करण्यात कोणत्याही अपयशामुळे किंवा त्यासंबंधात उद्भवणाऱ्या सर्व नुकसानासाठी आणि परिणामांसाठी कार्ड मेंबर पूर्णपणे जबाबदार आणि उत्तरदायी असेल.कार्ड मेंबरच्या निष्काळजीपणामुळे ओटीपी हरवणे, चोरी होणे किंवा गैरवापर होणे यामुळे उद्भवणाऱ्या उत्तरदायित्वाचा भार कार्ड मेंबर द्वारे सहन केला जाईल आणि याच्या परिणामस्वरुप क्रेडिट कार्ड रद्द केले जाऊ शकते.

15.6 ओटीपीचा गैर वापर होत आहे किंवा योग्य अधिकृततेशिवाय वापरले जात असल्याचे कार्ड मेंबरला वाटल्यास कोणतेही व्यवहार नाकारण्याचा अधिकार कार्ड मेंबरने राखून ठेवलेला आहे.

15.7 बँकेला वेळोवेळी आपल्या एकमेव आणि संपूर्ण विवेकबुद्धीच्या आधारे कोणत्याही सूचनेशिवाय ओटीपीचा उपयोग रद्द करण्याचा, किंवा कोणतेही कारण न देता, बदली किंवा सुधार करण्याच्या आवश्यकतेचा अधिकार आहे, म्हणून आणि त्याच्या परिणामस्वरुप कोणत्याही हानी किंवा नुकसानासाठी बँक जबाबदार असणार नाही.

## 16. हस्तांतरण आणि भरणा

www.rblbank.com वेबसाइट वरील हस्तांतरण आणि भरणा अटी आणि नियम पहा.

## 17. तृतीय पक्ष/सेवा प्रदात्याची नियुक्ती

17.1 कार्ड मेंबर जबाबदारी स्वीकारतो/स्वीकारते आणि आरबीएल बँकेला, तिच्या सहयोगींना त्याच्या/तिच्या अर्जाशी संबंधित सर्व माहिती, डेटा किंवा कागदपत्रे इतर आरबीएल बँक सहयोगी/ शाखा/ उपकंपनी/ बँका/ आर्थिक संस्था/ क्रेडिट ब्यूरो/ एजन्सी/ नियामक अधिकारी/ वैधानिक संस्था/ कर अधिकारी/ माहिती ब्यूरो/ अशाच इतर व्यक्तींना आरबीएल बँकेला आवश्यक किंवा योग्य वाटेल त्यानुसार किंवा अशा व्यक्तीद्वारे उल्लेखित माहिती/ डेटाच्या उपगोसाठी किंवा प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असेल तसे किंवा प्रक्रिया केलेली माहिती/ व्यवहाराचा डेटा/ उत्पादनाच्या पूर्ततेसाठी अदलाबदल, शेयर किंवा वाटप करण्यासाठी अधिकृत करतो/करते आणि या माहितीच्या वापरासाठी आरबीएल बँकेला जबाबदार ठरवणार नाही. मात्र, तृतीय पक्षाच्या कृती किंवा निष्काळजीपणामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही परिणामांसाठी बँक जबाबदार असणार नाही. थकीत देयके/रक्कम वसूलण्यासाठी बँकेला झालेल्या सर्व खर्च, शुल्क आणि रक्कमेच्या अतिरिक्त वसूलीसाठी अशा तृतीय पक्ष सेवा प्रदातांना केलेले सर्व भरणा कार्ड मेंबरच्या खर्च आणि जोखमीतून कापले जातील. भरणाच्या अंमलबजावीसाठी सदर प्रकरण कोणत्याही एजंटकडे पाठवणे किंवा कायदेशीर मार्ग अवलंबणे आवश्यक असल्यास, थकबाकी, कायदेशीर खर्च आणि व्याजासह विवेकाधीन रकमेच्या वसूलीश संबंधित सर्व खर्चासाठी कार्ड सदस्य जबाबदार असेल.

17.2 जर कार्ड मेंबर कोणत्याही आर्थिक सहाय्य/ सुविधा/ आर्थिक/ क्रेडिट सुविधेच्या मुद्दलची रक्कम किंवा व्याज/ शुल्काची देय रक्कमेची परतफेड करण्यांत किंवा भरणा करण्यांत कसूरवार ठरतो, आरबीएल बँक आणि/ किंवा आरबीआयला डिफॉल्टचा तपशील आणि कार्ड मेंबर/ किंवा त्यांचे संचालक/ भागीदार/ अॅड-ऑन कार्ड धारकांचे, जसे लागू होते तसे, नाव अशा पद्धतीने आणि अशा माध्यमाद्वारे जे आरबीएल बँक किंवा आरबीआयला त्यांच्या एकमेव स्वेच्छानिर्णयुसार योग्य वाटते तसे, उघड करण्याचा किंवा प्रकाशित करण्याता एक अपात्र अधिकार मिळेल. आरबीएल बँक क्रेडिट इंफॉर्मेशन कंपनी (रेग्युलेशन) अधिनियम, 2005 च्या अनुसार कार्ड मेंबरच्या क्रेडिट हिस्ट्री/ परतफेडीचे रेकॉर्ड आणि/किंवा देय स्थिती पूर्वीचे दिवसांच्या संदर्भातील माहिती क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्यूरोला जाहीर करेल. क्रेडिट कार्डसाठी अर्ज स्वीकारणे कार्ड मेंबरच्या क्रेडिट पात्रतेच्या प्रतिकूल नसण्याच्या अहवालांवर आधारित आहे. आरबीएल बँक कार्ड खात्यातील कोणत्याही कसूर विषयी इतर बँका किंवा आर्थिक संस्थांना कळवू शकते किंवा कार्ड किंवा इतर प्रकारे कार्ड मेंबरची क्रेडिट सुविधा मागे घेऊ शकते. प्रतिकूल अहवालांच्या प्राप्तीच्या आधारे (कार्ड मेंबर किंवा त्याच्या/ तिच्या कुटुंबातील सदस्यांच्या क्रेडिट योग्यतेच्या संदर्भात), आरबीएल बँक, लेखी 15 दिवसांच्या पूर्वसूचनेनंतर, क्रेडिट कार्ड रद्द करू शकते, जेथे कार्ड खात्यातील संपूर्ण थकीत रक्कम तसेच क्रेडिट कार्डच्या वापराद्वारे आलेले पुढील कोणतेही चार्जेस, जे कदाचित अजूनही कार्ड खात्यात बिल केलेले नसतील, कार्ड मेंबर द्वारे त्वरीत भरणा करायचे असतील. आरबीएल बँक कार्ड मेंबरला बँक किंवा आर्थिक संस्थेचे नाव उघड करण्यासाठी बांधील नाही, जेथून त्यांना ही माहिती मिळाली आहे किंवा ज्यांनी ही माहिती उघड केलेली.

## 18. क्रेडिट कार्ड पुन्हा जारी करणे आणि बदली करून देणे

18.1 जर कार्ड खराब होते/ हानी होते, त्याची मोडतोड होते, हरवते किंवा चोरीला जाते, तर कार्ड मेंबर बँकेच्या कोणत्याही शाखेतून किंवा 24 तासी ग्राहक सेवेच्या टोल फ्री क्रमांक 1800 121 9050 वर तुमची विनंती नोंदवून बदली क्रेडिट कार्डची मागणी करू शकतो. अशी सर्व बदली क्रेडिट कार्ड बदलीच्या वेळी प्रचलित अशा शुल्कांनुसार बँकेच्या विवेकबुद्धीनुसार पुरवली जातील. खराब झालेले कार्ड वापरू नये आणि ते चुंबकीय पट्टीवर आडवे कापून ताबडतोब बँकेला परत केले गेले पाहिजे. तसेच, कृपया क्रेडिट कार्डावरील चिप (कोणतीही असल्यास) दोन तुकड्यांमध्ये कापून नष्ट करा.

## 19. पत्ता आणि टेलिफोन क्रमांत बदल

19.1 कार्ड मेंबरने आपल्या पत्ता आणि/किंवा टेलिफोन क्रमांकातील कोणत्याही बदलाविषयी ताबडतोब बँकेद्वारे वेळोवेळी कळवलेल्या पत्त्यावर किंवा निर्धारित ग्राहक सेवा केंद्रावर लिखित किंवा टेलिफोनच्या माध्यमाने कळवले पाहिजे. पत्त्यातील बदलाची कोणतीही विनंती स्वयं-साक्षांकित पत्त्याच्या पुराव्यासह असावी.

## 20. दायित्वातून वगळणे

20.1 पुढील गोष्टींविषयी पूर्वग्रह न ठेवता, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या झालेल्या कोणत्याही हानी किंवा नुकसानाच्या संदर्भात बँक कार्डमेंबरच्या उत्तरदायित्वाखाली राहणार नाही.

a. पुरवठा केलेल्या कोणत्याही वस्तू किंवा सेवांमध्ये कोणताही दोष,

b. कार्ड मान्य करण्यासाठी किंवा स्वीकारण्यासाठी कोणत्याही व्यक्तीकडून नकार,

c. कोणत्याही इलेक्ट्रॉनिक टर्मिनलमध्ये बिघाड,

d. कार्डमेंबर व्यतिरिक्त इतरांना व्यवहाराच्या सुचना सांगणे,

e. कार्ड परत करण्याची विनंती करणारे कोणत्याही व्यक्तीद्वारे केलेले कोणतेही विधान किंवा कोणत्याही व्यक्तीद्वारे संयुक्तपणे केले गेलेले कोणतेही कार्य,

f. कार्ड मेंबर द्वारे बँकेच्या आवारात बँकेच्या नियुक्त कर्मचाऱ्यांशिवाय इतर कोणालाही कार्ड सुपूर्द करणे,

g. कार्डच्या दर्शनी भागावर नमूद समाप्ती तारखेच्या आधी ते परत करण्याची मागणी करण्याचा आणि प्राप्त करण्याच्या आपल्या अधिकाराचा प्रयोग, मग भलेही अशी मागणी आणि समर्पण बँक किंवा कोणतीही व्यक्ती किंवा कंप्युटर टर्मिनल द्वारे केलेली आणि/किंवा मिळवलेली असेल,

h. बँकेद्वारे कोणतेही कार्ड किंवा कार्ड खाते समाप्त करण्याच्या आपल्या अधिकाराचा प्रयोग, किंवा

i. क्रेडिट, चरित्र आणि प्रतिष्ठेला झालेली कोणतीही इजा, जी कथितपणे कार्ड पुन्हा ताब्यात घेतल्याने आणि/किंवा ते परत करण्यासाठी कोणत्याही विनंती किंवा कोणत्याही सेवा आस्थापना/ मेल ऑर्डर आस्थापनेद्वारे कार्ड मान्य किंवा स्वीकारण्यासाठी नकार दिल्याने झालेली आहे

j. बँकेद्वारे उघड केलेल्या कोणत्याही तपशीलांमध्ये कोणतेही खोटे वर्णन, विपर्यास, त्रूटी किंवा हयगय. बँकेकडून किंवा बँकेच्या वतीने कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती द्वारे कार्ड मेंबरकडून थकबाकीच्या पूर्ततेची मागणी किंवा दावा केला जात असल्यास, कार्ड मेंबरने सहमती दर्शवली पाहिजे आणि मान्य केले पाहिजे कि अशी मागणी किंवा दावा कोणत्याही प्रकारे बदनामी किंवा कार्ड मेंबरच्या चारित्र्यावर प्रतिकूल परिणाम करणारे किंवा दर्शवणारे कृत्य ठरणार नाही.

## 21. क्रॉस डिफॉल्ट

21.1 कार्ड मेंबर स्वीकारतो कि कार्ड मेंबर कराराच्या अंतर्गत जबाबदाऱ्या पार पाडण्यात कोणतीही कसूर झाल्यास ती कार्ड मेंबर कराराच्या अंतर्गत कसूर मानली जाईल आणि वरील कराराच्या अंतर्गत क्रेडिट कार्ड सुविधा समाप्त करण्याच्या अधिकारासहीत कोणत्याही किंवा सर्वच अधिकारांचा वापर करण्याचा अधिकार बँकेने राखीव ठेवलेला आहे.

21.2 बँकेद्वारे कार्ड मेंबरला देण्यात आलेल्या इतर कोणत्याही कर्ज आर्थिक क्रेडिट सुविधांच्या संदर्भात आणि या उलट परिस्थितीत कसूर झाल्यास क्रेडिट कार्ड सुविधा समाप्त करण्याचा बँकेचा अधिकार कार्ड मेंबरला मान्य आहे.

## 22. नेटवर्क पार्टनर (मास्टरकार्ड/ विसा/ रुपे) द्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा

22.1 नेटवर्क पार्टनर (मास्टरकार्ड/ विसा/ रुपे) द्वारे कार्ड मेंबरला काही आपात्कालीन सेवा दिल्या जातात. अशा सेवा नेटवर्क पार्टनर द्वारे तृतीय पक्षाच्या एजंट्स कडून पुरवल्या जातात. नेटवर्क पार्टनर कडून/द्वारे पुरवल्या जाणाऱ्या अशा आपात्कालीन सेवांचा लाभ घेण्यासाठी झालेल्या खर्चासाठी कार्ड मेंबर जबाबदार असेल.

22.2 नेटवर्क पार्टनर (मास्टरकार्ड/ विसा/ रुपे) कडून/द्वारे सर्वोत्तम प्रयत्नाद्वारे सहकार्य पुरवले जाते.

22.3 भारतातील किंवा जगभरातील कुठलीही बँक नेटवर्क पार्टनर (मास्टरकार्ड/ विसा/ रुपे) द्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांच्या व्यवस्था किंवा वापरासाठी जबाबदारी स्वीकारत नाही.

## 23. विमा लाभ

विमा संरक्षण/सुविधा पुरवणाऱ्या संबंधित विमा कंपनी द्वारे निर्धारित अटी आणि नियमांच्या अतिरिक्त, या अटी आणि नियमांच्या उद्देश्यासाठी, खालील अटी आणि नियम अशा विमा संरक्षणास नियंत्रित करतील:

23.1 विमा संरक्षण प्रत्येक कार्डसाठी वेगवेगळे असू शकते. कार्ड मेंबर समजतो कि विशिष्ट आरबीएल बँक कार्ड/को-ब्रँडेड कार्ड अंतर्गत कार्ड मेंबरला दिलेले विशिष्ट मोफत विमा संरक्षण त्याने/तिने तपासणी आणि समजून घेणे आवश्यक आहे.

23.2 कार्ड मेंबर विशेषकरून समजतो कि कोणत्याही कार्डवर देण्यात आलेले कोणतेही मोफत विमा संरक्षण/सुविधा, जर कोणतेही दिले आहे, कोणत्याही एक किंवा अधिक विशिष्ट श्रेणीच्या/प्रकारच्या कार्डसाठी कदाचित उपलब्ध नसेल.

23.3 विमा संरक्षण बँकेद्वारे दिले जात नाही. अपवाद/मर्यादा आणि दाव्याची प्रक्रिया संबंधित विमा कंपनी द्वारे जारी केलेल्या पॉलिसींनुसार लागू होतात. कार्ड मेंबर विशेषपणे स्वीकार करतो की त्यांना देण्यात आलेल्या कोणत्याही विमा संरक्षणाच्या आधारे आरबीएल बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही, मग भलेही अशा विमा संरक्षणासाठी कार्ड मेंबर द्वारे प्रिमियम भरले गेले असतील किंवा नसतील.

कार्ड मेंबर स्वीकार करतो की अशा सर्व विमा संबंधित दावे/बाबींसाठी संबंधित विमा कंपनी पूर्णपणे जबाबदार असेल आणि अशा विमा संरक्षणाशी संबंधित किंवा मुळे उद्‌भवणाऱ्या कोणत्याही बाबीसाठी कार्डमेंबर बँकेला जबाबदार ठरवणार नाही, मग भलेही ते अशा विमा संरक्षणातील कोणत्याही कमतरता किंवा दोष, वसूली किंवा भरपाईचा भरणा, दाव्यांची प्रक्रिया किंवा निपटारा किंवा इतर प्रकारे असेल, आणि अशा सर्व बाबी थेट संबंधित विमा कंपनीकडे संबोधित केल्या जातील आणि त्यांचे निराकरण केले जाईल आणि यातून आरबीएल बँकेला वगळले जाईल आणि आरबीएल बँकेकडून या संदर्भात कोणत्याही संपर्काची दखल घेतली जाणार नाही. मात्र, प्रस्तावित काही विमा संरक्षणांसाठी वर उल्लेखितमध्ये काही विशिष्ट अपवाद असू शकतात ज्यात आरबीएल बँक दाव्याच्या कागदपत्रांविषयी कळवण्यात आणि एकत्रत करण्यात सहायता करू शकते (परंतु ते करण्यासाठी बांधील नाही) आणि हे अशा विमा संरक्षणांच्या विक्रीच्या वेळी कळवण्यात येईल.

23.4 कार्ड मेंबर स्वीकार करतो कि अशाप्रकारे पुरवले गेलेले विमा संरक्षण कार्ड मेंबरला लागू संबंधित विमा पॉलिसीच्या अटींनुसारच उपलब्ध असेल, आणि फक्त तोपर्यंतच जोपर्यंत कार्ड मेंबर आरबीएल बँकेचा कार्ड मेंबर राहील आणि त्याचे कार्ड वैध कार्ड राहील, आणि कोणत्याही कारणामुळे कार्ड मेंबरशिप मागे घेतल्यावर (भलेही तात्पुरते किंवा कायमस्वरुपी), अशा विमा संरक्षणाचे लाभ आपोआपपणे आणि वास्तविकपणे कार्ड मेंबरशिपच्या समाप्तीच्या तारखेपासून उपलब्ध होणे बंद होतील. या व्यतिरिक्त, कार्ड मेंबर याच्याशी सुद्धा सहमत आहे की त्याची कार्ड मेंबरशिप सुरु असताना सुद्धा, आरबीएल बँक कोणत्याही पूर्व सुचनेशिवाय (तिच्या विवेकबुद्धीनुसार आणि/किंवा कोणतेही कारण न सांगता) अशा विमा संरक्षणाचे लाभ निलंबित करु, मागे घेऊ किंवा रद्द करू शकते, आणि हा लाभ सुरु ठेवण्यासाठी आरबीएल बँकेवर कोणतेही बंधनकारक बंधन राहणार नाही.

23.5 संबंधित विमा पॉलिसीध्ये दर्शवलेले लाभ ती कमाल रक्कम असेल ज्यासाठी कार्ड मेंबर संबंधित विमा पॉलिसीच्या मुदतीच्या दरम्यान कोणत्याही नुकसानासाठी पात्र असेल, ज्या अंतर्गत संबंधित विमा कंपनी द्वारे असे संरक्षण पुरवले जातात.

## 24. नेमणूक / सिक्युरिटायजेशन

कार्ड मेंबर स्पष्टपणे स्वीकार आणि मान्य करतो की बँक कोणत्याही पद्धतीने (ज्यामध्ये परक्राम्य संलेख काढण्याद्‌वारे किंवा इतर समाविष्ट आहे) पूर्णपणे किंवा आंशिकरित्या आणि अशा अटींवर (ज्यामध्ये कोणत्याही ग्राहक, नियुक्त आणि हस्तांतराच्या वतीने कार्डमेंबर विरुद्ध कारवाई करण्याचा बँकेने राखून ठेवलेल्या अधिकाराचा समावेश आहे) ज्या बँक ठरवू शकते, विक्री, नियुक्ती किंवा हस्तांतरण करण्यासाठी पात्र असेल, बँकेद्‌वारे कार्ड मेंबरला कोणत्याही संदर्भाशिवाय किंवा लिखित सूचनेशिवायर बँकेच्या पसंतीच्या कोणत्याही तृतीय पक्षाकडील कार्ड मेंबरच्या थकीत आणि देणी, आणि अशी कोणतीही विक्री, नियुक्ती किंवा हस्तांतरण अशा तृतीय पक्षाला केवळ कर्जदार म्हणून किंवा बँकेसोबत संयुक्त कर्जदार म्हणून स्वीकारणे बंधनकारक असेल, परंतु बँकेला हा अधिकार आहे की ती अशा तृतीय पक्षाच्या वतीने सर्व अधिकार वापरणे सुरु ठेवू शकते आणि अशा तृतीय पक्षाला अशी थकबाकी आणि देणी अदा करेल किंवा ते विनियोगित करेल, जसे बँक निर्णय घेईल. बँकेद्‌वारे अंमलबजावणी किंवा थकबाकी आणि देणीच्या तिच्या अधिकार आणि वसूलीसाठी झालेला कोणताही खर्च कार्ड मेंबरच्या खात्यातून कापला जाईल.

## 25. विविध

25.1 जेथे बँक कार्डशी संबंधित कोणत्याही बाबीच्या संदर्भात कार्ड मेंबर द्‌वारे केलेल्या कोणत्या मौखिक किंवा इलेक्ट्रॉनिक सूचना किंवा चौकशीला प्रतिसाद देण्यासाठी सद्भावनेने कृती करते, कार्ड मेंबरला अशा कोणत्याही सद्भावनेच्या कृतीविषयी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे होणाऱ्या कोणत्याही हानी, नुकसानाचे दायित्व, खर्च इत्यादीचा दावा किंवा आरोप करण्याचा अधिकार असणार नाही आणि कार्ड मेंबर या संदर्भात बँकेला निरपराध ठरवण्यासाठी सहमत आहे. 24.2 या कार्ड मेंबर कराराच्या अंतर्गत कार्ड मेंबरची उत्तरदायित्वे तोपर्यंत मुक्त केली जाणार नाही जोपर्यंत कार्ड खात्यातील थकबाकी पूर्णपणे चुकवली जात नाही.

25.2 कार्ड मेंबरच्या कॉर्पोरेट संस्थेच्या दिवाळखोरी, नादारी, विघटन झाल्यावर किंवा संपुष्टात आल्यावर किंवा प्राथमिक कार्ड मेंबरचा मृत्यू झाल्यास, कार्ड खात्यातील एकूण थकबाकी आणि कार्ड खात्यात अजूनही आकारण्यात न आलेल्या कोणतीही शुल्काची रक्कम बँकेला तात्काळ आणि पूर्णपणे देय होईल. कार्ड खात्यावरील कोणत्याही थकबाकीची भरपाई करण्यासाठी प्राथमिक कार्डमेंबरची मालमत्ता जबाबदार असेल आणि अशा थकबाकीची वसूली करण्यासाठी झालेल्या कायदेशीर फी आणि खर्चासह सर्व खर्चापासून बँकेला मुक्त ठेवले गेले पाहिजे. अशी परतफेड प्रलंबित राहिल्यास, बँकेला प्रचलित दराने शुल्कांच्या अनुसूचीमध्ये दिलेले वित्त शुल्क आणि इतर लागू शुल्क आकारणे सुरू ठेवण्याचा अधिकार असेल.

25.3 कोणत्याही सरकारी/नियामक संस्थेच्या सूचनांनुसार कार्ड खाते निलंबित सुद्धा केले जाईल. कार्ड वरील सर्व थकीत रक्कम सरकारी/नियामक संस्थेच्या सूचनांनुसार, प्रकरणानुसार, ताबडतोब देय असल्याची मानली जाईल, आणि सर्व थकबाकी ताबडतोब अदा करण्याच्या कार्ड मेंबरच्या दायित्वाविषयी पूर्वग्रह न ठेवता लागू संबंधित कायद्यांनुसार ते वसूल करण्याचा बँकेला अधिकार असेल.

25.4 बँकेला वेळोवेळी या सर्व किंवा कोणत्याही अटी व नियत जोडण्याचा आणि/किंवा त्यामध्ये सुधारणा करण्याचा अधिकार असेल, ज्या कार्डसदस्याला लेखी कळवल्या जातील. कार्ड मेंबर अशा सुधारणांसाठी तोपर्यंत बांधील असेल जोपर्यंत कार्ड खात्यातील सर्व थकबाकी भरली जात नाही आणि सुधारणा लागू होण्याच्या तारखेआधीपर्यंत कार्ड रद्द करण्यासाठी किंवा अर्धे कापण्यासाठी बँकेला परत केले जात नाही.

25.5 बँक आपल्या विवेकबुद्धीनुसार या अटी व नियमांच्या अंतर्गत कार्ड मेंबरला कोणतीही नवीन सुविधा किंवा विशेषता उपलब्ध करून देऊ शकते किंवा विद्यमान सुविधा किंवा विशेषता काढून घेऊ शकते.

25.6 सर्व प्रकाशित माहिती छपाईच्या वेळी बरोबर आणि पूर्ण आहे. छपाईनंतर होणाऱ्या बदलांची जबाबदारी बँक स्वीकारू शकत नाही.

25.7 एमआयटीसी (सर्वात महत्त्वपूर्ण अटी आणि नियम) साठी कार्डमेंबरने आमची वेबसाइट: www.rblbank.com पाहणे आवश्यक आहे.

## 26. स्प्लिट अँड पे

26.1 www.rblbank.com वेबसाइट वरील स्प्लिट अँड पे अटी आणि नियम पहा.

ईझी पे चे नाव बदलून स्प्लिट अँड पे करण्यात आले आहे.

## 27. ऑफर्स

27.1 आरबीएल बँक, वेळोवेळी, एकतर कार्ड घेतेवळी किंवा मिळवल्यानंतर तिच्या कार्ड मेंबरला विभिन्न व्यापारी आस्थापनांच्या ऑफर्स कळवू शकते. हे ग्राहकांना व्हाउचर्सच्या माध्यमातून कळवले जाऊ शकते जे को-ब्रँडेड असू शकतात किंवा फक्त व्यापारी आस्थापनेच्या असू शकतात.

27.2 या ऑफर्स केवळ सहभागी व्यापारी आस्थापनांकडून कार्ड मेंबरकडे आणल्या जातात. यासाठी सहभागी व्यापारी आस्थापनांचे नियम लागू होतील. आरबीएल बँक ऑफर देत नाही, कोणतीही हमी देत नाही आणि या ऑफर/व्हाउचरच्या अंतर्गत कार्ड मेंबर द्वारे घेतलेल्या उत्पादनांच्या/सेवांच्या वितरण, गुणवत्ता, व्यापारिकता किंवा योग्यतेची कोणतीही प्रतिनिधी नाही.

27.3 कार्ड मेंबर पुढे समजतो कि कार्ड मेंबरद्वारे व्यापारी आस्थापनेसोबत दिलेली कोणतीही माहिती त्याच्या/तिच्या विवेकबुद्धीनुसार असेल आणि व्यापारी आस्थापनेद्वारे अशा माहितीच्या वापर-गैरवापरासाठी तो/ती आरबीएल बँकेला उत्तरादायी किंवा जबाबदार ठरवणार नाही. या ऑफर/व्हाउचरच्या अंतर्गत कार्ड मेंबर द्वारे घेतलेल्या उत्पादनांच्या/सेवांच्या वितरण, गुणवत्ता, व्यापारिकता किंवा योग्यतेच्या संदर्भात कोणतेही विवाद कार्ड मेंबरने थेट सहभागी व्यापारी आस्थापने लिखित स्वरुपात संबोधित केले पाहिजे आणि या संदर्भात कोणत्याही संपर्काची आरबीएल बँक दखल घेणार नाही.

27.4 या ऑफर/व्हाउचरच्या अंतर्गत लाभ घेलेल्या उत्पादनांच्या/सेवांच्या वापर किंवा गैर-वापरामुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कार्ड मेंबरला झालेल्या कोणत्याही हानि किंवा नुकसानासाठी किंवा कोणत्याही वैयक्तिक अपायासाठी बँक जबाबदार असणार नाही.

27.5 कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय या ऑफर्स वाढवण्याचा किंवा समाप्त करण्याचा अधिकार आरबीएल बँकेने राखीव ठेवला आहे. आरबीएल बँकेने कोणत्याही क्षणी, कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय, त्या सर्व नियम आणि अटींमध्ये जोडण्याचा/ परिवर्तन/ सुधार/ बदल करण्याचा किंवा या ऑफरला पूर्णपणे किंवा आंशिकरित्या दुसऱ्या ऑफरने बदलण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे, मग भलेही ती या ऑफर सारखीच असेल किंवा नसेल, किंवा ऑफर पूर्णपणे मागे घेतली जाईल.

27.6 आरबीएल बँक कार्ड मेंबर लाभ घेतल्या जाणाऱ्या ऑफरच्या बदल्यात कोणत्याही स्वरुपात नुकसान भरपाई/लाभ मिळण्यास पात्र असणार नाही. या ऑफर्स रोख रक्कमेच्या बदल्यात अदल-बदल किंवा रीडीम केल्या जाऊ शकत नाही.

27.7 आरबीएल बँक कोणत्याही हानि किंवा नुकसान किंवा दाव्यासाठी कोणत्याही प्रकारे, जरा सुद्धा उत्तरदायी असणार नाही जे कोणत्याही कारणामुळे, ऑफर देण्यासाठी किंवा पूर्तता करण्यासाठी, किंवा ऑफर अंतर्गत दिलेले लाभ किंवा विशेषाधिकार पुरवण्यासाठी व्यापारी आस्थापनेच्या वतीने कोणत्याही नकार किंवा अपयशामुळे उद्भवू शकतात.

27.8 ऑफरचा फक्त तेव्हाच लाभ घेतला जाऊ शकतो जेव्हा ऑफरचा लाभ घेतेवेळी कार्ड चालू आणि चांगल्या स्थितीमध्ये आहे.

27.9 कोणत्याही कार्ड मेंबरला झालेल्या कोणत्याही प्रकारच्या हानिसाठी दिल्या गेलेल्या सेवेच्या कोणत्याही कमतरता किंवा अपुरेपणासाठी कोणत्याही प्रकारे आरबीएल बँक जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही.

27.10 ऑफर किंवा अटी आणि नियमांशी संबंधित कोणताही विवाद फक्त मुंबईतील न्यायालयांच्या अधिकारक्षेत्राच्या अधीन असतील. कोणताही वाद असल्यास लवाद आणि समन्वय अधिनियम, 1996 (आतापर्यंत सुधारणा केल्यानुसार) च्या तरतुदींच्या अंतर्गत नियंत्रित केला जाईल.

27.11 ऑफरमधील सहभाग ऐच्छिक आहे आणि तो पूर्णपणे कार्ड मेंबरच्या विवेकबुद्धीनुसार आहे.

27.12 ऑफरशी संबंधित सर्व बाबींमध्ये, आरबीएल बँकेचा निर्णय अंतिम आणि सर्व बाबतीत बंधनकारक असेल.

27.13 अशा प्रसंगी जेव्हा ऑफर, या अटी व नियम, किंवा त्यांचा कोणताही भाग लागू कायद्यानुसार प्रतिबंधित किंवा निषिद्ध असेल, ऑफर आणि/किंवा अटी व नियम (जसे असेल तसे) कायद्याचे पालन करण्यासाठी आवश्यक मर्यादेपर्यंत बदलले जाऊ शकतात.

27.14 ऑफरच्या अटी आणि नियम कार्डवर नियंत्रण ठेवणाऱ्या कार्ड मेंबर अटी आणि नियमांच्या अतिरिक्त असतील, त्यांच्या बदल्यात/कमी करण्यासाठी नाही. 26.14 कोणत्याही अटी आणि नियम जे अशा ऑफरला लागू होतात जी बेकायदेशीर, प्रतिबंधित किंवा कोणत्याही कायदा किंवा नियमांच्या अंतर्गत लागू न करण्यायोग्य आहे, उर्वरित अटी आणि नियमांना अवैध न ठरवता अशा बेकायदेशीरता, अवैधता, मनाई किंवा अंमलबजावी न करू शकण्याच्या मर्यादेपर्यंत अप्रभावी राहतील.

**28. भरपाईचा अधिकार/ बँकरचा ग्रहणाधिकार**

28.1 कोणत्याही कारणास्तव, जसे या करारामध्ये दिलेले आहे, कार्ड मेंबर द्वारे क्रेडिट कार्डावरील थकबाकी भरण्यास उशीर झाल्यास किंवा भरू न शकल्यास, कार्ड मेंबर स्पष्टपणे आणि बिनशर्त बँकेला वेळोवेळी बँकेच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही संपत्ती किंवा मालमत्तेच्या विरुद्ध कोणतीही थकबाकी समायोजित करण्यासाठी आणि भरपाई करण्यासाठी अधिकृत करतो, ज्यामध्ये कार्ड मेंबरचे वैयक्तिक किंवा संयुक्तपणे असलेले बचत खाते, चालू खाते आणि मुदत ठेवी खाती, किंवा आमच्याद्वारे कार्ड मेंबरला कोणत्याही क्षमतेने कोणत्याही खात्यावर देय असलेल्या कोणत्याही रक्कमेचा समावेश असून ते इतकेच मर्यादित नाही.कायद्यानुसार बँकेच्या ताब्यात असलेल्या त्यांच्या सर्व संपत्तींवर बँकेचा ग्रहणाधिकार असेल.

**29. सूट / संमती**

29.1 या करार, किंवा इतर कोणत्याही करार किंवा कागदपत्राच्या अंतर्गत कोणतीही कसूर झाल्यास बँकेला मिळणारा कोणताही अधिकार, शक्ति किंवा उपायाचा प्रयोग करण्यास उशीर झाल्यास किंवा प्रयोग करणे वगळल्यास, अशा कोणत्याही अधिकार, विशेषाधिकार, शक्ति किंवा उपायास होणार नाही, तसेच अशा कोणत्याही कसूरमध्ये सूट दिल्याचे/सहन केल्याचे किंवा कोणतीही संमती दिल्याचे मानले जाणार नाही, तसेच कोणत्याही कसूरच्या संदर्भात बँकेची कृती किंवा निष्क्रियता किंवा कोणत्याही कसूरच्या संदर्भात संमती, कोणत्याही नंतरच्या किंवा अशाच कसूरच्या संदर्भात बँकेच्या अधिकार, शक्ति किंवा उपायास प्रभावित किंवा कमजोर करणार नाही.

**30. लवाद**

30.1 या करार, किंवा उल्लंखन, समाप्ती किंवा वैधतेमुळे उद्भवलेल्या किंवा संबंधित कोणत्याही विवाद, वाद किंवा दावा, वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार लवाद आणि समन्वय अधिनियम, 1996 च्या तरतूदींच्या अंतर्गत बँकेच्या नियुक्त अधिकाऱ्यानुसार नियुक्त केलेल्या एकमेव पंचाकडे विवाद नमूद करून सोडवू शकते. लवादाची बैठक दिल्ली, भारत असेल. Tलवादाचे कामकाज इंग्रजी भाषेमध्ये असेल.

**31. अधिकार क्षेत्र आणि नियंत्रण कायदा**

31.1 या कार्ड मेंबर करारामुळे उद्भवलेले आणि/किंवा संबंधित सर्व विवाद दिल्ली, भारत येथील सक्षम न्यायालयांच्या विशेष अधिकारक्षेत्राच्या अधीन असतील. मात्र, हे सक्षम अधिकार क्षेत्रातील इतर कोणत्याही न्यायालयात समाविष्ट करण्याच्या/कारवाई करण्याच्या आरबीएल बँकेच्या अधिकारांना मर्यादित करत नाही.

31.2 हा करार भारताच्या कायद्यांद्वारे नियंत्रित केला जाईल.

**32. अनिवासी क्रेडिट कार्डांचा भरणा**

32.1 जर कार्ड मेंबरचा अनिवासी भारतीय (एनआरआय) दर्जा आहे, तर त्यांनी खात्री करायला हवी की त्यांच्या क्रेडिट कार्ड खात्यात होणारे सर्व भरणा हे त्यांच्या अनिवासी बँकिंग खात्यातून होणे आवश्यक आहेत.

32.2 नोकरीसाठी किंवा स्थलांतरासाठी परदेशात जाणाऱ्या निवासी कार्ड मेंबरने बँकेला त्याच्या निवासी स्थितीत झालेल्या बदलाची माहिती देणे आवश्यक आहे आणि त्याचे क्रेडिट कार्ड बंद करण्यासाठी अर्ज करणे आवश्यक आहे. जर निवासी स्थितीमध्ये बदल झाल्यानंतर कार्ड मेंबर द्वारे क्रेडिट कार्डात कोणताही भरणा करणे आवश्यक असेल, तर त्यांना आपल्या कार्डवरील सर्व देय भरणा आवक निधी/त्यांच्या अनिवासी बँक खात्यातून (एनआरई/ एनआरओ/ एफसीएनआर खात्यातून) करावे लागतील. कार्ड मेंबर सहमत आहे आणि यादवारे बँकेला आरबीआयने वेळोवेळी अधिसूचित केल्यानुसार प्रचलित विनिमय दराने अशा प्रेषणांचे भारतीय रुपयामध्ये रूपांतर करण्यास अधिकृत करतो. आपल्या निवासी स्थितीबद्दल बँकेला कळवणे ही कार्ड मेंबरची जबाबदारी आहे.

32.3 अनिवासी कार्ड मेंबर सहमत आहे आणि पुष्टि करतो कि कार्ड मेंबर त्यांच्या बचत खात्यातून किंवा इतर कोणत्याही बिगर-एनआरआय बँक खात्यातून रोख, धनादेश आणि निधी हस्तांतरण द्वारे कोणतेही पर्याय भरणा करणार नाही. ग्राहर वर उल्लेखित आवश्यकतांचे पालन करण्यात अयशस्वी ठरल्यास, कोणतीही सूचना न देता, कार्ड अवरुद्ध किंवा बंद करण्याचा एकमेव अधिकार बँकेकडे आहे.

32.4 कृपया लक्षात घ्या विद्यमान आरबीआय नियमांनुसार, आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डावर आंतरराष्ट्रीय शुल्कांच्या निपटाऱ्यासाठी एनआरओ खात्यातून कापलेली रक्कम एनआरओ खात्यातील रक्कमेच्या प्रत्यापर्णाच्या खालील प्रतिबंधाच्या अधीन आहे: एक अनिवासी भारतीय (एनआरआय) किंवा भारतीय मूळचे व्यक्ती (पीआयओ) आपल्या अनिवासी (साधारण) रुपये (एनआरओ) खात्यात ठेवलेल्या शिल्लकीतून, दर आर्थिक वर्षात, सर्व प्रमाणित उद्देश्यांसाठी, एक दशलक्ष मिलियन अमेरिकन डॉलर इतकी रक्कम पाठवू शकतात, जे भारतात लागू होणाऱ्या कराच्या, कोणतेही, भरणा करण्याच्या अधीन आहे.

32.5 आरबीएल बँक क्रेडिट कार्ड बाळगलेले परदेशी नागरिक किंवा प्रवासी भारतात राहण्यासाठी वैध विसा (किमान 6 महिने वैधता असलेला) बँकेकडे सादर केल्याची खात्री करतील. वैध विसाच्या अनुपस्थितीत, बँकेला क्रेडिट कार्ड ताबडतोब अवरुद्ध/रद्द करण्याचा किंवा बंद करण्याचा अधिकार आहे.

**33. सुरक्षित क्रेडिट कार्ड अटी**

33.1 "सुरक्षित क्रेडिट कार्ड" चा अर्थ होतो आरबीएल बँकेद्वारे कार्ड धारकास आरबीएल बँकेत ठेवलेल्या मुदत ठेवीच्या विरुद्ध जारी केलेले आरबीएल बँक क्रेडिट.

33.2 सुरक्षित क्रेडिट कार्ड मिळवण्यासाठी पात्र होण्यासाठी, कार्ड धारकाला बँकेच्या आंतरिक धोरणानुसार किंवा आरबीएल बँकेत किमान ₹ 1,00,000/- रक्कमेचे मुदत ठेव ठेवणे/सांभाळणे आवश्यक असेल.

33.3 सुरक्षित क्रेडिट कार्डावरील क्रेडिटची मर्यादा मुदत ठेवीच्या रक्कमेच्या नव्वद टक्के (90%) पर्यंत असेल. उल्लेखित क्रेडिटची मर्यादा वेळोवेळी आरबीएल बँकेच्या विवेकबुद्धीनुसार बदलाच्या अधीन असू शकते आणि आरबीएल बँकेला योग्य वाटेल अशा माध्यमाने आणि पद्धतीने कार्डधारकास कळवले जाईल.

33.4 कार्डधारकाने आरबीएल बँकेद्वारे वेळोवेळी स्पष्ट केल्यानुसार संबंधित कागदपत्रांच्या अंमलबजावणीनंतर आणि स्पष्ट केलेल्या पद्धतीने मुदत ठेव ठेवणे आवश्यक असेल. कार्डधारकाने फक्त आरबीएल बँक शाखेत किंवा इतर दुसऱ्या पर्यायी माध्यमात मुदत ठेव जमा करण्याची आवश्यकता असेल जे वेळोवेळी आरबीएल बँकेद्वारे आपल्या विवेकबुद्धीनुसार निश्चित केले आणि कळवले जाईल.

33.5 अशा प्रकारे उघडलेल्या मुदत ठेवी फक्त स्वयं नूतनीकरण माध्यमासोबतच उघडल्या जातील. कार्डधारक/ आरबीएल बँकेद्वारे कार्ड रद्द केल्याच्या प्रसंगी, सुरक्षित क्रेडिट कार्डाशी जोडलेली मुदत ठेव कार्डधारकाद्वारे मुदत ठेव ठेवण्याच्या वेळी दिलेल्या सुचनांनुसार सुरु राहिल.

33.6 सुरक्षित क्रेडिट कार्ड जारी केल्यावर, सुरक्षित क्रेडिट कार्ड समाप्ती पर्यंत किंवा मुदत ठेवीच्या परिपक्वतेपर्यंत, जसे असेल तसे, कार्डधारका द्वारे कमावलेल्या व्याज दरासह, कार्डधारकाद्वारे ठेवलेल्या मुदत ठेवीच्या संपूर्ण रक्कमेवर बँकेचा ग्रहणाधिकार असेल.

33.7 अर्जदाराकडे आरबीएल बँकेत विद्यमान मुदत ठेव असल्यास, सदर मुदत ठेव कार्डधारकाच्या सुरक्षित क्रेडिट कार्ड खात्यासोबत जोडली जाईल आणि मुदत ठेव तात्काळ प्रभावाने स्वयं-नूतनीकरण माध्यमात रूपांतरित केली जाईल. उल्लेखित मुदत ठेव रक्कमेवर मुदत ठेवीच्या स्वयं-नूतनीकरणाच्या वेळी प्रचलित व्याज दर लागू होईल.

33.8 सुरक्षित क्रेडिट कार्डासोबत जोडलेल्या मुदत ठेवीतून कार्डधारक कोणतेही आंशिक रक्कम काढू शकणार नाही.

33.9 एचयुएफ, भागीदारी संस्था, अल्पवयीन किंवा अर्जदारांद्वारे संयुक्तपणे उघडलेल्या/ठेवलेल्या मुदत ठेवी सुरक्षित क्रेडिट कार्डासाठी पात्र नसतील. फक्त एक व्यक्तीच्या नावे असलेल्या मुदत ठेवी सुरक्षित क्रेडिट कार्डासाठी पात्र असतील.

33.10 मुदत ठेव सुविधेसाठी नामनिर्देशन सुविधा उपलब्ध असेल.

33.11 मुदत ठेव किंवा सुरक्षित क्रेडिट कार्ड समाप्त / मागे घेतल्याच्या/ रद्द केल्याच्या प्रसंगी किंवा जर अंतिम देय तारखेच्या 60 दिवसांच्या आत सुरक्षित क्रेडिट कार्डावरील थकीत रक्कम भरण्यास कार्डधारक अयशस्वी ठरल्यास, किंवा कोणतीही फी, शुल्क किंवा अटींनुसार आरबीएल बँकेद्वारे आकारलेली इतर कोणतीही रक्कम मिळून सुरक्षित क्रेडिट कार्डावरील थकीत रक्कम कोणत्याही क्षणी मुदत ठेवीच्या रक्कमेच्या 95% पेक्षा अधिक होते, तर जमा झालेले व्याज मिळून संपूर्ण मुदत ठेवीची रक्कम रोकडीत रुपांतर करण्याचा आणि सुरक्षित क्रेडिट कार्डाच्या अंतर्गत थकीत रक्कमेच्या विरुद्ध आरबीएल बँकेला भरणा करुन अशा रक्कमेने भरपाई करण्याचा अधिकार आरबीएल बँकेला असेल. वर उल्लेखित कपात केल्यानंतर उरलेली कोणतीही शिल्लक कार्डधारकास परत केली जाईल.

33.12 मुदत ठेवीवर ग्रहणाधिकार अंकित केल्यानंतर सुरक्षित क्रेडिट कार्ड सक्रिय केले जाईल.

33.13 कोणत्याही क्षणी कार्डधारकाला फक्त एकच सुरक्षित क्रेडिट कार्ड जारी केले जाऊ शकते.

## 34. वार्षिक शुल्क परावर्तन

34.1 पहिले बिल तयार झाल्याच्या तारखेपासून 12 महिन्यांना एक वर्ष म्हणून ग्राह्य धरले जाईल.

34.2 व्यापारी आस्थापनेद्वारे जमा केलेल्या व्यवहाराच्या तारखेच्या आधारे खर्चाची गणना केली जाईल.

34.3 व्यापारी आस्थापनेद्वारे व्यवहाराची तारीख व्यवहाराच्या वास्तविक तारखेपेक्षा वेगळी नमूद केल्यास त्यासाठी आरबीएल बँकेला जबाबदार ठरवले जाणार नाही.

34.4 पात्र खरेदी मूल्यातून क्रेडिट कार्डावरील कर्जाशी संबंधित सर्व ईएमआय, डायल एन ईएमआय, बॅलेन्स कन्वर्जन आणि बॅलेन्स ट्रांसफर प्रोग्राम, रोख रक्कम काढणे, फी शुल्क आणि सेवा कर वगळले जातील.

34.5 कोणताही विवादास्पद व्यवहार पात्र खरेदी मूल्याच्या गणनेसाठी ग्राह्य धरला जाणार नाही. व्यापाराकडून आलेला परतावा पात्र खरेदी मूल्याच्या गणनेमध्ये ऋण समायोजन म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

**तृतीय पक्षाच्या ऑफर्ससाठी अस्वीकरण:**

पार्टनर सह तृतीय पक्षाद्वारे दिल्या जाणाऱ्या ऑफर/ उत्पादने/ सेवांच्या संदर्भात आरबीएल बँक ना कोणती हमी देते आणि ना कोणतेही प्रतिनिधित्व करते. तृतीय पक्षाच्या वेबसाइटहून खरेदी केलेल्या उत्पादने आणि सेवांच्या संदर्भात कोणत्याही प्रश्न, तक्रारी, समस्या आणि/किंवा अभिप्रायासाठी, कार्डमेंबर थेट फक्त तृतीय पक्षासोबत संपर्क करेल.इतर मंचांवर लाभ/ सेवा सुद्धा उपलब्ध असू शकतात. अशा लाभ / सेवांचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांचा सहभाग पूर्णपणे ऐच्छिक आहे.

**उत्पादन लाभ**

उत्पादनाशी संबंधित लाभ आणि संबंधित अटी आणि नियमांसाठी, कृपया www.rblbank.com वर क्रेडिट कार्ड विभागाच्या अंतर्गत भेट द्या.

**उत्पादनाशी संबंधित अटी आणि नियम:**

उत्पादनाशी संबंधित अटी आणि नियमांसाठी, कृपया खाली दिलेल्या लिंकवर भेट द्या.

| **कार्ड** | **उत्पादनाशी संबंधित अटी आणि नियमांची लिंक** |
|---|---|
| आयकॉन | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| वर्ल्ड सफारी | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| प्लॅटिनम मॅक्जिमा | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| प्लॅटिनम मॅक्जिमा प्लस | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| पॉपकॉर्न | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| मूव्हीज अँड मोर | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| प्लॅटिनम डिलाइट | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| टायटेनियम डिलाइट | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| कूकीज | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| मंथली ट्रीट्स | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| पैसाबाजार ड्युअट | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| पैसाबाजार ड्युअट प्लस | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| प्ले | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| शॉपराइट | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| मनीटॅप | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| वीकार्ड | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| सेवमॅक्स | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| सेवमॅक्स प्रो | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| मनीटॅप ब्लॅक | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| लेझीपे | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| आयग्लोब | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| पार्क प्लस | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| रिंग | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| डीएमआय फायनांस | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |
| इनसिग्निया | इथे क्लिक करा अटी आणि नियम पाहण्यासाठी |

CC/CMA/04/03/2024

www.rblbank.com

**आरबीएल बँक लिमिटेड**
युनिट 306-311, तिसरा मजला, जेएमडी मेगापोलिस, सोहना रोड, सेक्टर - 48, गुरगाव - 122 018, हरियाणा. नोंदणीकृत कार्यालय: पहिली गल्ली, शाहुपूरी, कोल्हापूर - 416001, भारत. CIN: L65191PN1943PLC007308